# पंतप्रधान मोदींचे मणिपूरच्या नागरिकांना शांततेचे आवाहन



**इंफाळ :** वांशिक संघर्ष उफाळलेल्या मणिपूरचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि.१३) दौरा केला. या दौऱ्यातील एका कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान मोदींनी मणिपूरमधील सर्व गटांना हिंसाचार सोडून भावी पिढ्यांच्या हितासाठी शांततेच्या मार्गावर येण्याचे आवाहन केले. हिंसाचाराचे केंद्रस्थान राहिलेल्या चुराचंदपूर येथे पंतप्रधान मोदींनी विस्थापित झालेल्यांची भेट घेतली, तेथील मदत शिबिरात वृद्ध आणि मुलांशी संवाद साधला. पंतप्रधान मोदींनी मणिपूरसाठी तीन हजार कोटी रुपयांचे विशेष पॅकेज जाहीर केले. त्यामध्ये हिंसाचारामुळे विस्थापित झालेल्यांना मदत करण्यासाठी ५०० कोटी रुपये समाविष्ट आहेत तसेच घरे गमावलेल्या कुटुंबांसाठी सरकार सात हजार नवीन घरे बांधण्यास मदत करीत आहे आणि योग्य ठिकाणी पुनर्वसनासाठी प्राधान्य देत आहे, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ५७
www.ramprahar.com

रविवार, १४ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

रोह्याच्या टिटवी येथील जंगलात हातभट्टी उद्ध्वस्त/२
माणगावात सप्टेंबरमध्येच धुक्याची चाहूल/५
सागरी सुरक्षा चषक कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन/८

### पंतप्रधान मोदींच्या आईचा अवमानकारक व्हिडीओ

# भाजप महिला मोर्चाकडून काँग्रेसचा निषेध



**अलिबाग : प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) गैरवापर करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्रींचा काँग्रेस पक्ष बिहारच्या वतीने अवमानकारक व्हिडीओ तयार करून तो सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आला आहे. याचा भारतीय जनता पक्ष दक्षिण रायगड जिल्ह्यातर्फे काँग्रेसचा निषेध करण्यात आला.

भाजप महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष डॉ. चित्रा पाटील यांच्या नेतृत्वाखाली पेझारी येथे शनिवारी (दि. १३) महिला मोर्चातर्फे निषेध रॅली काढण्यात आली. काँग्रेस पक्ष मुर्दाबाद, माते का अपमान नही सहेगा हिंदुस्तान, भारत माता की जय, वंदे मातरम् अशा घोषणा देत भाजप महिला मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी पेझारी परिसर दणाणून सोडला.

भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार पंडित पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अ‍ॅड. आस्वाद पाटील, महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष डॉ. चित्रा पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, सवाई पाटील, सरचिटणीस अ‍ॅड. महेश मोहिते, प्रिती संजय पाटील, रश्मी वाजे, वंदना म्हात्रे, सुनंदा पाटील, हेमा मानकर, संजय पाटील, अ‍ॅड. मनश्री मोहिते, चेतन पाटील, रोशन भगत, वंदना म्हात्रे, स्मिता पाटील, कुंदा गावंड आदी पदाधिकारी व कार्यकर्ते या निषेध आंदोलनात सहभागी झाले होते.

# माथेरानच्या समस्या मार्गी लावा

■ भाजप शिष्टमंडळाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन





**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान भारतीय जनता पक्षाच्या शिष्टमंडळाने खासदार धैर्यशील पाटील आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेऊन नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत निवेदन दिले आणि त्या मार्गी लावण्याची मागणी केली. त्यास जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

या शिष्टमंडळात भाजप माथेरान शहराध्यक्ष प्रवीण सकपाळ, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, भाजप जिल्हा कार्यकारिणी सदस्य चंद्रकांत जाधव, सरचिटणीस राजेश चौधरी, युवा सदस्य गौरव सकपाळ आदींचा समावेश होता.

सुप्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमधील समस्या सुटाव्यात यासाठी भाजप जोमाने कामाला लागलेला आहे. माथेरानमधील नागरिकांना आणि पर्यटकांना भेडसावणाऱ्या समस्या त्वरित मार्गी लागल्या पाहिजेत यासाठी येथे भाजप कार्यकर्ते जीवाचे रान करताना दिसत आहेत. वेळोवेळी संबंधित अधिकारीवर्गाकडे निवेदन देऊन समस्यांचे निवारण करण्यासाठी कार्यकर्त्यांची धडपड दिसत आहे.

याच अनुषंगाने राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील आणि पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत माथेरान भाजप शिष्टमंडळाने शुक्रवारी (दि.१२) रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेऊन माथेरानमधील समस्या कथन करीत निवेदन सादर केले. माथेरान येथील करदात्यांच्या करावरील शास्ती माफ करण्याबाबत पुढील आदेश मुख्याधिकारी यांना दिले जातील, असे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी या भेटीदरम्यान दिले. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला एमपी ९३ हा त्वरित पालिकेकडे हस्तांतरित करण्यात यावा, सनियंत्रण समितीमध्ये दोन स्थानिक व्यक्तींचा समावेश करावा, अर्धवट अवस्थेत असणारा सांडपाणी प्रकल्प दिवाळी हंगाम सुरू होण्याआधी पूर्ण व्हावा, स्थानिकांसह पर्यटकांच्या मोबाईल नेटवर्कचा प्रश्नदेखील सोडविण्यात यावा अशा विविध विषयांबाबतचे निवेदन या वेळी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत सविस्तर माहिती घेऊन या समस्या सोडविण्यासाठी सकारात्मकता दर्शवली असल्याचे सांगण्यात आले.

माथेरान हे थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. देशी-विदेशी पर्यटक दरवर्षी माथेरानला भेट देऊन येथील निसर्ग पर्यटनाचा आस्वाद घेतात, पण अलिकडे माथेरानमधील स्थानिकांसह पर्यटकांना काही अडचणींचा सामना करावा लागत आहे. माथेरान हे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असल्याने कामे करताना बराच पाठपुरावा करावा लागतो. भाजपकडून तो केला जात असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

# महागाव पंचक्रोशीत पुन्हा जमिनीला हादरे



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील महागाव परिसर पुन्हा एकदा हादरला आहे. या ठिकाणी शुक्रवारी रात्री उशिरापासून शनिवारी पहाटेपर्यंत अनेकदा मोठ मोठ्या आवाजासह जमिनीला कंप जाणवला. त्यामुळे येथील ग्रामस्थ भितीच्या छायेत आहेत.

महागाव, भोप्याचीवाडी, देऊळवाडी, चंदरगाव व कोंडप या

## ग्रामस्थ भितीच्या छायेत

गावांमध्ये सलग बसलेल्या धक्के बसले. ग्रामस्थांकडून मिळालेल्या माहितीनुसार शुक्रवारी (दि. १२) रात्री १० वाजता, मध्यरात्री १२, शनिवारी (दि. १३) पहाटे तीन वाजता, साडेतीन वाजता तसेच साडेपाच वाजता हे हादरे बसले. त्यामुळे गावकरी घरातून बाहेर पडले.

या आधीही फेब्रुवारी महिन्यात महागाव पंचक्रोशीत असेच हादरे जाणवले होते. त्या वेळी तज्ज्ञांनी हे धक्के भूगर्भातील हालचालींमुळे झाल्याची शक्यता व्यक्त केली होती. चार वर्षांपूर्वीदेखील या परिसरात जमिनीला मोठ्या प्रमाणात लांब व विस्तीर्ण भेगा गेल्या होत्या. वारंवार अशा घटना घडत असल्याने ग्रामस्थ सातत्याने दहशतीत जगत असून प्रशासनाकडे योग्य तपासणी व मार्गदर्शन करण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, सुधागड तहसील कार्यालयाकडून तलाठी व मंडळ अधिकारी यांना तातडीने महागाव पंचक्रोशीत पाहणीसाठी रवाना करण्यात आले असल्याचे तहसीलदार उत्तम कुंभार यांनी सांगितले. त्याचप्रमाणे पुन्हा एकदा भूगर्भतज्ज्ञांना बोलवण्यात येईल, असेही तहसीलदार म्हणाले.

# मनसेच्या प्रकाश महाजनांचा राजीनामा



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रवक्ते आणि दिवंगत प्रमोद महाजन यांचे बंधू प्रकाश महाजन यांनी पक्षाचा राजीनामा दिला आहे. पक्षाच्या स्थापनेपासून मनसेमध्ये कार्यरत असणारे प्रकाश महाजन यांच्या अचानक राजीनाम्यामुळे पक्षसंघटनेत सर्वकाही आलबेल नसल्याची चर्चा आहे. जुलै महिन्यात पक्षाच्या मेळाव्याचे निमंत्रण न मिळाल्यामुळे त्यांनी नाराजी व्यक्त केली होती.

प्रकाश महाजन यांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले की, राज ठाकरेंना मी मनातून काढू शकत नाही. मी फक्त अमित ठाकरेंचा अपराधी आहे. मला विधानसभा निवडणुकीत फक्त प्रचार करण्यासाठी वापरून घेतले, पण पक्षात कोणतीही जबाबदारी देण्यात आली नाही. ज्यांच्या अपेक्षा कमी असतात त्यांचीच जास्त उपेक्षा होते, असे मला वाटत आहे. त्यामुळे मी आता थांबायचा निर्णय घेतला.

## निवडक

### जहाल महिला नक्षलीचे आत्मसमर्पण

**गडचिरोली :** जहाल महिला नक्षलवादी व केंद्रीय समिती सदस्य पोथुला पद्मावती उर्फ सुजाता (वय ६२) हिने तेलंगणा पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. ६३ राजकीय नेते आणि सामान्य नागरिकांसह २०७ जवानांच्या खुनाचा सुजातावर आरोप आहे. तिच्यावर विविध राज्यांत मिळून दोन कोटींहून अधिक रुपयांचे इनाम होते.

### आरक्षणासाठी युवकाची आत्महत्या

**धाराशिव :** बंजारा समाजालाही हैदराबाद गॅझेटप्रमाणे आरक्षण द्यावे, या मागणीसाठी धाराशिवच्या मुरूममधील नाईकनगर येथील तरुणाने सुसाईड नोट लिहून गळफास घेत आत्महत्या केल्याचे वृत्त आहे. पवन गोपीचंद चव्हाण (वय ३२) असे या तरुणाचे नाव आहे.

# मोखाड्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट कॉलेज पुरस्कार

## मुंबई विद्यापीठाकडून सन्मान; उद्या वितरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठाने सर्वोत्कृष्ट ग्रामीण महाविद्यालय पुरस्कारासाठी रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाची निवड जाहीर केली आहे. उच्च दर्जाचे शिक्षण आणि ग्रामीण भागात शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाविद्यालयाला हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

या पुरस्काराचे वितरण १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधील ग्रीन टेक्नॉलॉजी ऑडिटोरियम येथे एका विशेष समारंभात होणार आहे. तसे पत्र मुंबई विद्यापीठाचे रजिस्टार डॉ. प्रसाद कारंडे यांनी महाविद्यालयाला दिले आहे.

थोर देणगीदार तसेच महाविद्यालयाचे विकास समितीचे प्रमुख व रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मोखाडा महाविद्यालयाच्या विकासासाठी मोठे योगदान दिले आहे. या ठिकाणी दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांना मिळत आहे, त्या अनुषंगाने महाविद्यालयाने प्रगती साधली.

अत्यंत दुर्गम भागात असलेल्या या परिसरात विद्यार्थ्यांची तसेच शिक्षक आणि पालकांची मोठी गैरसोय होती. सोयीसुविधांपासून त्यांना वंचित राहावे लागत होते. त्यामुळे प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना अडचण भासत होती. आदिवासीबहूल परिसरात १९८४ साली स्थापन झालेल्या या विद्यालयाला भरारी देण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मोखाडा विद्यालयाला भेट दिली आणि तेथील परिस्थिती बदलवून विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा निश्चय केला. दुर्गम भागातील विद्यार्थी सक्षम झाला पाहिजे ही लोकनेते रामशेठ ठाकूर यांची कायम तळमळ राहिली आहे. त्यामुळे त्यांनी ताबडतोब कार्यवाही केली आणि प्रत्यक्षात निश्चय पूर्ण करीत मोखाडा परिसरातील विद्यार्थ्यांसाठी भव्य स्वरूपात महाविद्यालयाची इमारत साकारली.

आज या ठिकाणी दुर्गम भागातील वाडी वस्तीतील विद्यार्थी दर्जेदार शिक्षण घेत आहेत. त्यानुसार उच्च दर्जाचे शिक्षण आणि ग्रामीण भागात शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मुंबई विद्यापीठाकडून लोकनेते रामशेठ ठाकूर मोखाडा महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार जाहीर झाला आणि ही बाब रयत शिक्षण संस्था व महाविद्यालयासाठी अभिमानास्पद सन्मानाची आहे.

# पनवेलमधील मालमत्ताधारकांना लवकरच मिळणार ई-पासबुक

## अशी सेवा देणारी राज्यातील पहिलीच महापालिका ठरणार



**कळंबोली : दीपक घोसाळकर**

मालमत्ताधारकाने महापालिकेला वर्षागणिक किती मालमत्ता कर भरला आहे? मालमत्ता करामध्ये कोणकोणत्या गोष्टी अंतर्भूत आहेत? यासारखी इत्यंभूत माहिती आता पनवेलमधील मालमत्ताधारकांना लवकरच मोबाईलच्या एका क्लिकवर मिळणार आहे.

पनवेल महापालिकेतील मालमत्ता कर विभागातील अधिकारी एक सॉफ्टवेअर तयार करून त्या माध्यमातून नागरिकांना आपला मालमत्ता कर किती भरला गेला आहे याबाबतचे ई-पासबुक मोबाईलमध्येच देणार आहेत. याची घोषणा लवकरच महापालिकेचे आयुक्त व प्रशासक डॉ. मंगेश चितळे करणार आहेत, अशी माहिती उपायुक्त स्वरूप खरगे यांनी दिली.

पनवेल महापालिका क्षेत्रात ३६ लाख ४००० मालमत्ताधारक आहेत. या सर्वांना आपण भरलेला मालमत्ता कर हा २०२६पासून पुढे कसा किती भरला गेला आहे? मालमत्ता कर वर्ष गणित भरलेला असताना त्यामध्ये कोणकोणत्या गोष्टींचा अंतर्भाव आहे? कशा कशासाठी आपण मालमत्ता कर भरला आहे याची तपशीलवार माहिती मालमत्ताधारकांना घरी बसून आपल्या मोबाईलमध्ये पाहता येणार आहे. यासाठी महापालिकेचा मालमत्ता कर विभाग सक्रिय झाला आहेत.

आधुनिकतेची कास धरून नवीन विकसित तंत्रज्ञानाचा वापर करीत पनवेल महापालिका ही ज्याप्रमाणे बँकेमध्ये आपले पासबुक मिळते त्याच प्रकारे मालमत्ताधारकांना ई-पासबुकच्या माध्यमातून मालमत्ता कराचे विवरण मोबाईलच्या एका क्लिकवर उपलब्ध करून देणार आहे. यामुळे मालमत्ताधारकांचा वेळ आणि खर्चाची बचतही होणार आहे. त्यांना वारंवार महापालिकेत येऊन मालमत्तेच्या कराविषयी माहिती घेण्यासाठी हेलपाटे मारावे लागणार नाहीत.

### नव्या तंत्रज्ञानाचा वापर

नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून सहजपणे मालमत्ताधारकांना आपले ई-पासबुक पाहून मालमत्ता कराविषयी खातरजमा करता येणार आहे. विशेष म्हणजे अशा प्रकारे मालमत्ताधारकांना पासबुक देणारी राज्यातील पहिली महापालिका होण्याचा बहुमान ही पनवेल मनपा पटकावणार आहे. यामध्ये काही आक्षेप त्रुटी असतील, तर महापालिकेच्या मालमत्ता विभागाशी संपर्क करून त्या त्रुटी दूर केल्या जाणार आहेत.




### आशिया चषक स्पर्धेत आज

# भारत-पाक महामुकाबला

**दुबई : वृत्तसंस्था**

कट्टर पारंपरिक प्रतिस्पर्धी भारत आणि पाकिस्तान यांच्यात रविवारी (दि. १४) आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत सामना रंगणार आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्ला आणि 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारत-पाकिस्तानमधील तणाव वाढला आहे. या पार्श्वभूमीवर उभय देशांतील क्रिकेट सामन्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

आयसीसी स्पर्धांमध्ये दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत झालेल्या १६ विश्वचषक सामन्यांपैकी १५ सामन्यांमध्ये भारताने विजय मिळवला आहे. यात एकदिवसीय विश्वचषकात दोन्ही संघांमध्ये आठ सामने झाले, जे सर्वच्या सर्व भारताने जिंकले आहेत. टी-२० विश्वचषकातदेखील आठ सामने खेळवण्यात आले असून त्यातील सात सामने भारताने, तर १ सामना पाकिस्तानने जिंकला आहे. टीम इंडियाचे हेच यश आशिया चषकातही दिसून येते.

१९८४पासून आतापर्यंत खेळल्या गेलेल्या १६ आशिया स्पर्धांमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात १८ सामने झाले आहेत. यापैकी १० सामन्यांमध्ये भारताने, सहा सामन्यांमध्ये पाकिस्तानने विजय मिळवला, तर दोन सामन्यांचा निकाल लागला नाही.

एप्रिल महिन्यात पहलगाममध्ये २६ पर्यटकांची झालेली हत्या आणि त्यानंतर भारताने पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर केलेल्या हल्ल्यानंतर दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले आहेत. या पार्श्वभूमीवर भारत आणि पाकिस्तान दुबईमध्ये पहिल्यांदाच क्रिकेटच्या मैदानात आमने-सामने येणार आहेत.

राम प्रहर

दिवाळी २०२५

मुक्तछंद

मुक्तपणे व्यक्त होणारे विविध विषयांवरील लेख, कथा, कविता, व्यंगचित्र आणखी बरेच काही आपण यंदाच्या दिवाळी अंकात मांडणार आहोत. लेख आणि कथा यांना शब्दमर्यादा असेल ती सुमारे तीनशे ते पाचशे शब्दांपर्यंत. संपादक मंडळाला जे साहित्य सर्वार्थाने योग्य वाटेल त्याच साहित्याला प्रसिद्धी दिली जाईल. आपला मजकुर टाईप केलेली ओपन फाईल सोमवार, १५ सप्टेंबर २०२५पर्यंत दै. रामप्रहरच्या मेलवर पोहचणे आवश्यक आहे. हाताने लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.
चला तर लागूया कामाला...

ramprahar@gmail.com

# आदिवासींच्या जीवनात लवकरच आमुलाग्र परिवर्तन घडेल -मुख्यमंत्री

## यवतमाळ येथे ३३५ कोटींच्या विविध विकासकामांचे लोकार्पण, भूमिपूजन

**यवतमाळ : प्रतिनिधी**

आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र शासनाने महत्वाच्या योजना हाती घेतल्या असून, त्यासाठी देशात एक लक्ष कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे. महाराष्ट्रातही आदिवासी समाजासाठी घरे, रस्ते, वीज, पाणी, वसतिगृह व रोजगार अशा सुविधांसाठी योजना-उपक्रम राबविण्यात येत असून, पुढील तीन वर्षांत आदिवासींच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन घडेल, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यवतमाळ येथे व्यक्त केला.



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते यवतमाळ येथे एकूण ३३५ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे लोकार्पण, भूमिपूजन तसेच विविध उपक्रमांचा शुभारंभ झाला, त्यावेळी ते बोलत होते. मृद व जलसंधारणमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, खासदार संजय देशमुख, आमदार राजू तोडसाम, आमदार किसनराव वानखेडे, सईताई डहाके, संजय डेरकर, श्याम कोडे, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी विकास मीना आदी या वेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आदिवासी समाजासाठी ५४ हजार कुटुंबांना घरे, नळांद्वारे पाणी, उपचारासाठी दवाखाने, वसतिगृह अशा अनेक सुविधा वेगाने पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदिवासी विकासासाठी ज्या योजना व उपक्रम आणले, तशी भरीव कामगिरी त्यापूर्वी झालेली नाही. आदी कर्मयोगी योजनेतून जिल्ह्यातील ३६६ गावांची निवड झाली आहे. योजनेतून राज्यातील ३० लाख युवकांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. त्यातून स्थानिक नेतृत्वाचा विकास होणार आहे.

शेतकऱ्यांना दिवसा दहा तास मोफत वीज देण्याचेही नियोजन आहे. पावसाने जिल्ह्यात शेती, घरे, पशुधन यांचे नुकसान झाले. त्याची भरपाईही लवकरात लवकर अदा केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. जिल्ह्यात अनुकंपा तत्वावर २७ उमेदवारांना सेवेत घेण्यात आले. त्यातील चार उमेदवारांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. विविध विभागांतर्फे योजनांची माहिती देणारे कक्षही उभारण्यात आले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

# तुर्भे परिसरात इंग्रजी माध्यम शाळा आणि हॉस्पिटल होणार -मंत्री नाईक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई मंत्रालयात वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाधिकारी, ठाणे व नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये तुर्भे नाका परिसराच्या विकासासंदर्भात महत्वाची बैठक शुक्रवारी झाली. या वेळी परिसरात इंग्रजी माध्यम शाळा आणि हॉस्पिटल निर्माण करण्याचे निर्देश वनमंत्री गणेश नाईक यांनी संबंधित प्रशासनास दिले.



या बैठकीत हनुमान नगर, तुर्भे (सर्वे क्र. ३७६) येथील पीसीसी कंपनी यांना देण्यात आलेला भूखंड नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय देण्यात आला. या भूखंडावर गरीब व सर्वसामान्य मुलांसाठी भव्य इंग्रजी माध्यमाची शाळा व गरीब व सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यसेवेसाठी ५० बेडचे हॉस्पिटल हे दोन महत्वाचे प्रकल्प उभारले जाणार आहेत. तसेच वनमंत्री गणेश नाईक यांनी ठाणे जिल्हाधिकारी यांना भूखंड त्वरित नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याचे व नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांना भूखंडावर कुंपण बांधून ताब्यात घेण्याचे आदेश दिले आहेत.

या ऐतिहासिक निर्णयामुळे तुर्भे नाका व तुर्भे स्टोअर परिसरातील गोरगरीब नागरिकांचे इंग्रजी माध्यमातील शिक्षणाचे स्वप्न साकार होईल व हॉस्पिटल निर्माण होणार असल्यामुळे नागरिकांना जवळच आरोग्य सुविधा उपलब्ध होतील.


प्रकल्पांसाठी माजी नगरसेवक अमित अमृत मेढकर हे सतत प्रयत्नशील होते. या निर्णयांमुळे त्यांच्या गेल्या ३ ते ४ वर्षांच्या पाठपुराव्याला आता यश आले आहे. दरम्यान, आजची बैठक म्हणजे माझ्या गोरगरीब नागरिकांसाठी मी केलेल्या अथक प्रयत्नांची व पाहिलेल्या स्वप्नपूर्तीची पहिली पायरी, असे माजी नगरसेवक अमित मेढकर यांनी बोलताना सांगितले.

# टिटवी येथील जंगलात हातभट्टी उद्ध्वस्त

### रोहा पोलिसांची मोठी कारवाई

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा पोलीस ठाणे हद्दीतील टिटवी गावच्या जंगल भागातील नदीच्या ओहळामध्ये सुरू असलेला हातभट्टी दारू व्यवसाय उध्वस्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार पोलीस पथक, दोन पंच व सरकारी वाहनासह तपासासाठी घटनास्थळी गेले असता साधारण एक किलोमीटर जंगल भागात तीन झोपड्यांमध्ये दारू तयार करण्याचे साहित्य आढळले.



दारू पाडण्यासाठी लागणारे रसायन, लाकूड, भांडी व १६ प्लास्टिक पिंप सापडले. या पिंपांमध्ये ४,००० लिटर रसायन मिळून आले. प्रति लिटर ६० रुपये असा हिशोब करता सुमारे २ लाख ४० हजार रुपयांचा प्रोव्हेशनचा माल असल्याचे निष्पन्न झाले. पंचांच्या उपस्थितीत सदर मालाचा पंचनामा करून नमुने रासायनिक विश्लेषणासाठी पाठवण्यात आले असून उर्वरित माल नष्ट करण्यात आला.

या ठिकाणी पोलिसांनी एका संशयितास ताब्यात घेतले. त्याने आपले नाव योगेश साहू झोरे (वय २६, रा. टिटवी, ता. रोहा) असे सांगितले. तसेच ही भट्टी ही त्याची व मिलिंद दामू झोरे (२८), काशिनाथ बाबू ढेबे (५३), बाळाराम कोंडू होगडे (५०) यांची असल्याची कबुली दिली.

रोहा पोलिसांनी संबंधित आरोपीवर गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे तर पुढील तपास पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चालु आहे.

# राज्यातील बारव व ऐतिहासिक विहिरींचे फेरसर्वेक्षण करणार -मंत्री आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या महाराष्ट्रातील बारव व विहीरींचे जिल्हानिहाय सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी जाहीर केले. आज सांस्कृतिक विभागातर्फे तज्ज्ञांसोबत सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार यांनी बैठक घेऊन बारव संवर्धन, संरक्षण याबाबत आढावा घेतला.

याबाबत सविस्तर माहिती देताना त्यांनी सांगितले की, प्राथमिक माहिती जी समोर आली आहे त्यामध्ये राज्यात ऐतिहासिक वारसा असलेल्या आणि पुराणकाळापासून ज्यांच्या नोंदी सापडतात अशा ३,००० च्या वर बारव आहेत.

या सगळ्यामध्ये ऐतिहासिक मूल्य सुद्धा आहेत. ज्या पद्धतीचं स्थापत्यशास्त्र वापरलं आहे, त्या स्थापत्यशास्त्राचा नमुना जगामध्ये दुर्मिळ आहे. जलसंवर्धन आणि जलसंधारण याचं कार्यही होतंय. त्या पाण्याची उपयोगिताही झाली पाहिजे. आणि म्हणून राज्यभरातल्या जिल्हाशहा असलेल्या या सगळ्या बारव आणि त्या बारवाच्या नोंदणी याची आवश्यकता लक्षात येते. म्हणून या बारव जतन, संवर्धन आणि उपयोगिता याची स्पष्ट उद्दिष्ट्ये आणि हेतूदर्शित केलेला नव्याने शासन निर्णय जारी करण्यात येणार आहे.


या सगळ्यामध्ये शासकीय यंत्रणेतील अधिकारी व जलसंधारणात, ऐतिहासिक वारसा विषयामध्ये काम करणाऱ्या तज्ज्ञांची समिती करण्यात येणार आहे, असे मंत्री शेलार यांनी सांगितले.

बरोबर, ज्यावेळेला सर्वेक्षणातल्या सगळ्या गोष्टी पूर्ण झाल्यावर यापुढे जिल्हाशहा राज्यभरात यांची उपयोगिता आणि याचं जतन, संवर्धन कसे केले पाहिजे ते लोकसहभागातून, विद्यार्थी असेल, जिल्हाधिकारी असेल, जिल्ह्यातले तज्ज्ञ असतील त्याचं जनतेमध्ये माहिती जास्तीत जास्त पोहचवण्यासाठी पथनाट्य किंवा अन्य कुठला प्रकार असेल या पद्धतीने त्याची कार्यपद्धती सुद्धा स्पष्ट करण्याचा निर्णय घेतलेला आहे. म्हणून येत्या तीन महिन्यांमध्ये यातला प्राथमिक सर्वेक्षणाचा राज्यातल्या सर्व बारवांच्या नोंदीचा स्पष्ट अहवाल येईल, असे मंत्री शेलार यांनी सांगितले.

# जेएनपीए एसईझेड पवनऊर्जा करारांद्वारे शंभर टक्के हरित ऊर्जा

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

देशातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जेएनपीएने शाश्वततेकडे मोठी पावले टाकत घोषणा केली आहे की जेएनपीए-विशेष आर्थिक क्षेत्राने (एसईझेड) आपल्या सर्व कामकाजासाठी शंभर टक्के हरित ऊर्जेकडे यशस्वी संक्रमण केले आहे. या एसईझेडने १ सप्टेंबर २०२५ पासून प्रभावी ठरणाऱ्या ६.० मेगावॅट ग्रिड-कनेक्टेड पवनऊर्जेच्या खरेदीसाठी नव्या अल्पकालीन ओपन ॲक्सेस करारावर स्वाक्षरी केली आहे. या करारान्वये वीज खरेदीचा दर केवळ रु. ३.१२ प्रति युनिट (केडब्ल्यूएच) इतका कमी होणार आहे.




एक परवानाधारक म्हणून, जेएनपीए एसईझेड वीज मंत्रालयाने निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, खुल्या प्रवेशाद्वारे ग्राहकांसाठी वीज खरेदी करते. ऑगस्ट २०२१ मध्ये स्थापन झाल्यापासून, एसईझेड पारंपारिक स्त्रोतांकडून ६.३० रुपये केडब्ल्यूएच दराने वीज मिळवत आहे. हे संक्रमण पर्यावरणीय आणि आर्थिकदृष्ट्या एक महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यामुळे खर्च कमी करताना हरित ऑपरेशन्स सक्षम होतात. हे पाऊल जेएनपीए एसईझेडच्या पर्यावरणीय जबाबदारी, कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि शाश्वत औद्योगिक विकासासाठीच्या वचनबद्धतेला बळकटी देते, ज्यामुळे देशभरातील इतर आर्थिक क्षेत्रांसाठी एक उदाहरण स्थापित होतो.

हे यश जेएनपीएच्या प्रभावी हरित उपक्रमांकडे वाटचाल करण्याच्या अथक प्रयत्नांना अधोरेखित करते आणि बंदर आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रासाठी शाश्वत भविष्य घडवण्यात त्यांच्या नेतृत्वाला अधोरेखित करते. जेएनपीएमध्ये आम्ही ठामपणे मानतो की शाश्वतता आणि प्रगती ही हातात हात घालून पुढे जायला हवी. आमच्या एसईझेडचे शंभर टक्के हरित ऊर्जेकडे झालेले संक्रमण हे जबाबदार व भविष्याभिमुख औद्योगिक परिसंस्था घडवण्याच्या आमच्या दृष्टीकोनाचे प्रतिक आहे. या उपक्रमामुळे केवळ पर्यावरणावरील आमचा परिणाम कमी होत नाही.

तर एसईझेडमध्ये कार्यरत उद्योगांसाठी स्पर्धात्मक फायदेही निर्माण होतात. या हरित बदलाचे नेतृत्व करून जेएनपीए भारतातील शाश्वत, बंदर-केंद्रित औद्योगिक विकासाला गती देणारा आघाडीचा घटक असल्याची पुन्हा एकदा पुष्टी करत असल्याचे जेएनपीएचे अध्यक्ष व व्हीपीपीएलचे अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक उन्मेष वाघ यांनी या यशाबद्दल म्हटले म्हटले आहे.

# 'मंत्री गणेश नाईक यांच्या वाढदिवसाला विविध सामाजिक उपक्रम राबवणार'

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या पुढाकाराने नवी मुंबईत राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विविध शंभरभर समाजोपयोगी व सामाजिक उपक्रमांचे आयोजन असलेला पंधरवडा साजरा करण्यात येणार असल्याचे भाजप नेते दशरथ भगत यांनी शुक्रवारी (दि.१२) वाशी येथील पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.




सेवाभावी उपक्रम १५ ते ३० सप्टेंबर २०२५ दरम्यान, साजरा होणार आहे. भारतीय जनता पार्टी, प्रभाग क्र. ६५, ७७ आणि ७८ मधील जनतेच्या सेवेत अविरतपणे कार्यरत असलेल्या माजी नगरसेविका फशीबाई करसन भगत, वैजयंती दशरथ भगत व रुपाली निशांत भगत यांच्या प्रभागातील व नवी मुंबईतील सक्रिय भाजपा कार्यकर्ते आणि नागरिक यांच्या सहभागातून एकूण १०० विविध प्रकारच्या सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य, धार्मिक व सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे दशरथ भगत यांनी पुढे बोलताना सांगितले.


नवी मुंबईतील वाशीगांव, सानपाडा -पामबीच व जुईनगर विभागातील तसेच नवी मुंबईसह इतर विभागातील अनेक कार्यकर्ते मिळून राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या वाढदिवसाला विशेष भेट म्हणून लोकसहभागातून सदरचे सेवाभावी सर्व उपक्रम करणार असल्याचे कार्यक्रम समन्वयक संदीप भगत यांनी या वेळी बोलताना सांगितले.

या जन्मदिन पंधरवड्यात जेष्ठ नागरिक, विविध शैक्षणिक संस्था, खेळाडू, माजी सैनिक, शिक्षक, डॉक्टर्स, स्वच्छतादूत, विविध शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, शासकीय आस्थापना, दिव्यांग विद्यार्थी व नागरिक, महिला मंडळे, महिला बचत गट, महिला रिक्षा चालक, विविध धार्मिक संस्था, पोलीस प्रशासन, गो-शाळा, सामाजिक वनीकरण, पर्यावरण संवर्धक, वारकरी मंडळे, रुग्णसेवा देणाऱ्या व रुग्णांवर उपचार देणाऱ्या आस्थापना, योगा व अन्य प्रकारांतील फिटनेस प्रशिक्षक तसेच वृद्धाश्रम या घटक व संस्था यांना सहभागी करून विविध शंभरी सेवाभावी उपक्रम राबवित असल्याचे कार्यक्रमाचे संयोजक निशांत भगत यांनी सांगितले.

# अटक करण्याची धमकी देत २६ लाखांची केली फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीबीआय ऑफिसर असल्याचे सांगून कुलाबा पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे त्यात अरेस्ट करत आहोत असे सांगून २६ लाख सहा हजार आठशे रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी राजेश मिश्रा आणि विक्रांत सिंग राजपूत यांच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात ६ सप्टेंबर रोजी पुन्हा दाखल करण्यात आला.




शशांक शेखर दासरॉय हे कोप्रोली, कोणार्क रिवर सोसायटी येथे राहत असून ते सेवानिवृत्त आहेत. ३० ऑगस्ट रोजी त्यांना व्हिडिओ कॉल आला आणि सीबीआय ऑफिसर कुलाबा पोलीस ठाणे अशी ओळख सांगून फसवणुकीच्या गुन्ह्यात हाऊस अरेस्ट करण्यात येत आहे असे सांगितले. व्हिडीओ कॉल कट केला तर कधीही पोलीस घरी येऊन जातील असे सांगण्यात आले. त्यानंतर विक्रांत सिंग असे नाव सांगून मी प्रोफाईल फोटो बदलत आहे असे सांगितले आणि तुम्ही गुन्हयातील मुख्य संशयित असल्याचे सांगून मनी लॉन्ड्रीग आणि फसवणुकीच्या गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असल्याची माहिती दिली. या वेळी सेंट्रल ब्युरो ऑफ इन्वेस्टीगेशनचे चिन्ह असलेले दोन लेटर हेड असलेले लेटर पाठवून तुम्हाला सुद्धा अशा प्रकारे अटक होऊ शकते असे बोलून त्यांनी पोलिसांसोबत आरोपीचे फोटो असलेले तीन फोटो व्हॉट्सअॅपवर पाठवले.

या वेळी माझे नाव या प्रकरणातून कसे काढता येतील अशी विनंती शशांक यांनी केली असता त्यांनी बँक खात्याची माहिती देण्यासाठी विचारणा केली. त्यांनी सांगितल्याप्रमाणे २६ लाख सहा हजार आठशे रुपये पाठवले. ४ सप्टेंबर रोजी त्या क्रमांकावर संपर्क साधून झालेल्या केसबाबत विचारणा केली असता संपर्क झाला नाही. याची माहिती त्यांनी त्यांच्या मुलाला दिली. या वेळी मोबाईल चेक करून पाहिले असता फसवणूक झाल्याचे त्याने सांगितले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात शेअर मार्केट विषयावर कार्यशाळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ११ ते १३ सप्टेंबर २०२५ दरम्यान बी.कॉम व बी.कॉम (अकाऊंटिंग अँड फायनान्स) विभागातील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी कॉमर्स असोसिएशनच्या वतीने शेअर मार्केट प्राविण्य या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.



या कार्यशाळेला एकूण १५८ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदवला तसेच विद्यार्थ्यांना शेअर मार्केटच्या कार्यपद्धती, गुंतवणूक धोरणे, नियामक संस्था यासंबंधी सखोल माहिती मिळाली. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता वाढीस लागली असून, भविष्यातील गुंतवणूक निर्णय घेण्यासाठी उपयुक्त मार्गदर्शन मिळाले. या कार्यशाळेतील सत्रे SEBI या भारतीय शेअर बाजार नियंत्रक संस्थेच्या तज्ज्ञ व्यक्तींनी यशस्वीरित्या पार पाडली. ११ सप्टेंबर रोजी मुलाबीर शेख, १२ सप्टेंबर रोजी ओमकार परब, १३ सप्टेंबर रोजी कौशल मिश्रा यांनी अनुक्रमे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या यशस्वी आयोजनाबद्दल महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे कॉमर्स असोसिएशनचे समन्वयक डॉ. प्रवर शर्मा, कॉमर्स अँड अकौंटन्सी विभागाचे प्रमुख विशाल देशमुख, आणि कॉमर्स व अकाऊंटग आणि फायनान्स विभागातील सर्व शिक्षकवृंदांचे अभिनंदन केले ज्यांच्या सहकार्यामुळे ही कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली असे नमूद केले.

या कार्यशाळेचे आयोजन प्रा. राहुल कांबळे यांनी केले तसेच कॉमर्स असोसिएशन, अकाउंट न फायनान्स तसेच कॉमर्स व अकाउंटन्सी विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## दास्तान फाटा परिसरात मृतदेह

**पनवेल :** दास्तान फाटा परिसरात एका अज्ञाताचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकाचा शोध उरण पोलीस करीत आहेत. अनोळखी व्यक्ती पुरूष वय अंदाजे ३५ वर्ष, अंगाने सडपातळ, उंची साधारण पाच फुट तीन इंच, रंग सावळा, चेहरा उभट, डोक्यास पाठीमागुन जखम, केस काळे पांढरे, दाढी मिशी काही पांढरी व वाढलेली, डोळे बंद, अंगात नेसुस निळ्या रंगाची जीन्स व निळा फुल शर्ट, कमरेला हिरव्या रंगाचा कापडी पट्टा आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उरण पोलीस ठाणे किंवा सहा.पोलीस निरीक्षक स्वप्नील केदार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दुखवटा

### नरेंद्र जाधव

**माणगाव :** तालुक्याचे माजी सभापती सुजित शिंदे यांचे आत्या भाऊ व नवी मुंबई वाशी येथील माजी नगरसेविका आरती शिंदे यांचे भाऊ नरेंद्र शंकर जाधव ऊर्फ काका यांचे ९ सप्टेंबर २०२५ रोजी निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी गुरुवारी (दि.१८) व उत्तर कार्य शनिवारी (दि.२०) त्यांच्या माणगाव येथील निवासस्थानी करण्यात येणार आहे.



## निवडक

### रस्त्यावर उभ्या गाडीची चोरी

**पनवेल :** शहरातील आशियना सोसायटीच्या गेटजवळील झाडा खाली रस्त्यावर उभी करून ठेवलेली इको गाडी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. सुनील बोर्डे यांची एक लाख रुपये किमतीची इको गाडी (एमएच ४६ एक्स ९६२२) ही वरील ठिकाणी उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** शहरातील कर्नाळा भाजी मार्केट परिसरात उभी करून ठेवलेली मोटरसायकल अज्ञात चोराने चोरून नेल्याची घटना घडली आहे. दत्तात्रय येवले यांच्या नावे असलेली ४० हजार रुपये किमतीची होंडा शाईन मोटरसायकल (एमएच ४६ बीएस २७४६) हिची अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

### अपघातात स्कुटीचालकाचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात वाहनाच्या धडकेने स्कुटीचालकाचा मृत्यू झालियाची घटना पनवेलजवळील जंगल कट गव्हाण फाटा येथे घडली आहे. मयत व्यक्ती मयुरेश म्हात्रे (वय २४, रा.उरण) हे त्यांच्या ताब्यातील एक्टीव्हा स्कुटीवरून पनवेल येथील आपल्या राहत्या घरी मुळेखंड येथे जात असताना जंगल कट, गव्हाण फाटा येथे आल्यावेळी त्यांच्या गाडीला कोणत्यातरी अज्ञात वाहनाने ठोकर दिल्याने झालेल्या अपघातात ते गंभीर रित्या जखमी होऊन मयत झाले आहेत. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.



**नवीन पनवेल : येथील दिलीप मधुकर घरत यांच्या घरी विराजमान झालेला गौरा गणपती.**

# खारघर, कळंबोलीत रस्ते दुरुस्तीला वेग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेतर्फे चारही प्रभागातील रस्ते दुरुस्तीच्या कामांना मोठ्या प्रमाणावर सुरूवात झाली आहे. नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी बांधकाम विभागाला वेगाने कामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. दरम्यान, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी खारघरमधील सेक्टर २१ मधील तवा हॉटेल शेजारी सुरू असलेल्या रस्त्यांच्या क्राँकीटीकरणाच्या कामाची पहाणी केली.

पनवेल महापालिका आयुक्तांनी बांधकाम विभागाला रस्ते दुरूस्तीबाबत तातडीने कारवाई करण्याच्या सूचना आहेत. त्याप्रमाणे गेल्या काही दिवसांपासून महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागामधील रस्त्यांवरील खड्डे बुजविणे व डांबरीकरणास सुरूवात झाली आहे.

कळंबोली प्रभागामध्ये देखील रस्ते दुरूस्तीचे काम जोमाने सुरू असून खिडुकपाडा, मॅक्डोनल्ड समोरील सर्व्हिस रोड, सेक्टर १७, ,१५.२०,१३,१४ , २३, मार्बल मार्केट, आदिवासी वाडी फूडलँड मागे, टेंभोडे गाव अशा विविध ठिकाणी रस्ते दुरूस्तीचे कामे वेगाने सुरू आहेत.

पनवेल महापालिकेच्यावतीने शहरातील रस्ते दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहेत. अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे व शहर अभियंता संजय कटेकर प्रत्यक्ष पाहणी करून कामांची सातत्याने माहिती घेत आहेत. नागरिकांची गैरसोय होऊ यासाठी तातडीने व नियोजनबद्ध पद्धतीने कामे पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश कनिष्ठ अभियंत्यांना देण्यात आले.

महापालिकेच्या बांधकाम विभागाने प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र कनिष्ठ अभियंते नियुक्त केले असून, त्यांच्या देखरेखीखाली रस्ते दुरुस्तीची कामे वेगाने पार पाडली जात आहेत.



## भाजपच्या प्रयत्नांतून चिपळे गावात गतिरोधक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल-माथेरान रस्त्यावर असलेल्या चिपळे गावात नागरिकांच्या मागणीनुसार गतिरोधक बसवण्यात आला आहे. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत आणि युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांच्या प्रयत्नांतून हा गतिरोधक बसवण्यात आला. यामुळे गावातील ज्येष्ठ नागरिकांची मागणी पूर्ण झाली असून, स्थानिकांनी याबद्दल सर्वांचे आभार मानले आहेत.

गेल्या अनेक दिवसांपासून चिपळे येथील नागरिक पनवेल-माथेरान रस्त्यावर गतिरोधक बसवण्याची मागणी करत होते. या मागणीची दखल घेत विश्वजीत पाटील यांनी पनवेल सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार केला होता. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वात आणि अरुणशेठ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली हा पाठपुरावा करण्यात आला. या मागणीनुसार, ठाकूर इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून मोफत गतिरोधक उपलब्ध करून देण्यात आला आणि पनवेल सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तो योग्य ठिकाणी बसवण्यात आला. या वेळी भाजपचे चिपळे अध्यक्ष समीर पाटील उपस्थित होते.

गावातील नागरिकांनी आमदार प्रशांत ठाकूर, अरुणशेठ भगत आणि विश्वजीत पाटील यांचे आभार मानले आहेत.






**कळंबोली : एआयचा गैरवापर करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्रींचा काँग्रेस बिहारच्या वतीने अवमानकारक व्हिडीओ तयार करून तो सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आला. याबद्दल भाजप शहर मंडळतर्फे काँग्रेस पक्षाचा जाहीर निषेध करण्यात आला. महिला मोर्चा उत्तर रायगड अध्यक्ष प्रिया मुकादम यांच्या नेतृत्वाखाली हे निषेध आंदोलन करण्यात आले. या वेळी माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मंडळ सचिव सुनीता हिरावले, सरस्वती कथारा व महिला मोर्चा पदाधिकारी उपस्थित होत्या.**

## एमएनएम विद्यालयात आंतरशालेय निबंध स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या गव्हाण-कोपर येथील मोरू नारायण म्हात्रे विद्यालय (एमएनएम) व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी पदार्पण वर्षाबद्दल शाळेच्या प्राथमिक विभागामार्फत भारतीय सैनिकांचे ऑपरेशन सिंदूर या विषयावर आंतर शालेय निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



या स्पर्धेमध्ये संस्थेच्या विविध संलग्न प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी तसेच शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय उलवे या शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे उद्घाटन माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका सौ प्रणिता गोळे तसेच प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी यांनी केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी स्पर्धकांना शुभेच्छा देत विद्यार्थ्यांच्या कल्पकता सृजनशीलता, अभिव्यक्ती, याला वाव मिळत असून भारतीय सैनिकांच्या शौर्य, खडतर प्रवास, देशाभिमान, देशभक्ती याची माहिती ओळख विद्यार्थ्यांना होते तसेच विद्यार्थ्यांच्या विकासासाठी वरील स्पर्धा पोषक असल्याचे प्रतिपादन केले.

शाळेच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे यांनी उपस्थित स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. शाळेच्या सांस्कृतिक विभागाच्या, शर्मिन काझी, प्रगती यशवंतराव यांनी कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये आजी-आजोबा दिवस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये शनिवारी (दि.१३) आजी-आजोबा दिवस उत्साही व आनंददायक वातावरणात झाला.

पूर्व प्राथमिक विभागातर्फे आयोजित या कार्यक्रमांमध्ये सुमारे ५० आजी-आजोबांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाची सुरवात आजी आजोबांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली त्यांनतर पूर्वप्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सुंदर आजीआजोबा वर गाणे गायले. यांनतर आजी आजोबा व नातवंड याच्यामधील प्रेम व्यक्त करण्यासाठी नातवंडानी त्यांना ओवाळले. ह्या खास दिवशी आजी आजोबांच्या बालपणीचे काही खेळ आयोजित करण्यात आले होते. त्यासोबतच सर्व आजी आजोबांनी आपल्या नातवंडांसोबत सोबत विविध ॲक्टिव्हिटीमध्ये सहभाग घेतला. गाणे भाषण खेळ इत्यादी विविध गोष्टीमुळे आजी-आजोबांना आपल्या बालपणाची आठवण झाली.



सर्व नातवांनी आजी-आजोबांच्या चरणावर फुले वाहून त्यांच्या आशीर्वाद घेतले. या वेळी सर्व आजी-आजोबांचे चेहरे आनंदी व भावुक झाले होते. असे विविध उपक्रम स्कूलच्या वतीने नेहमी आयोजित व्हावेत, असे सदिच्छा व्यक्त करत प्रत्येकाने या कार्यक्रमाबद्दल स्कूलचे आभार मानले.

स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनीदेखील कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल सर्व आजी आजोबांचे आभार मानले. अशाप्रकारे अत्यंत उत्साही वातावरणात आजी आजोबा दिवस हा कार्यक्रम पार पडला.

## गव्हाण विद्यालयात आनंददायी शनिवार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनियर कॉलेजमध्ये इयत्ता सातवी अ,ब,क या तीन वर्गातील विद्यार्थ्यांनी आनंददायी शनिवार हा उपक्रम १३ सप्टेंबर रोजी अत्यंत उत्साहात साजरा केला.



### विद्यार्थ्यांनी बनवल्या आकर्षक वस्तू

विद्यार्थ्यांनी कार्यानुभव अंतर्गत कागदी पिशव्या तयार केल्या तसेच टाकाऊ कापडापासून बाहुल्या तयार केल्या. मेंहदी काढणे, फुले तयार करणे, कागदांच्या रंगीत माळा तयार करणे, पेन होल्डर तयार करणे, मोटार तयार करणे व कागदी ड्रोन तयार करणे, वॉल हँगिंग तयार करणे या सारख्या वस्तू तयार करताना विद्यार्थी तल्लीन व कार्यमग्न झाले होते.

इयत्ता सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे ह्या उपक्रमांमध्ये सहभाग नोंदविला. कोपर गावचे ग्रामस्थ राजन शरद म्हात्रे यांचे वतीने विद्यार्थ्यांना गोड खाऊ देण्यात आला.हा उपक्रम साजरा करण्यासाठी विदयालयाच्या प्राचार्या ठाकूर जे.एस, उपमुख्याध्यापक लेंभे व्ही.वाय.तसेच विद्यालयाच्या पर्यवेक्षिका पाटील एस.सी. ह्यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. त्यांचेसह विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक व संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर आदींनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमासाठी राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांचे नियोजन व कार्यवाही करण्यासाठी गव्हाण विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ह्यांचे सहकार्य लाभले.

इतत्ता सातवी अ च्या वर्गशिक्षिका ठाकूर एस.एस.व सातवी ब आणि क च्या वर्गशिक्षिका घरत पी.जे.ह्यांनी विद्यार्थ्यांना योग्य शिस्तीने व अचूक मार्गदर्शन करून हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.



**मोहोपाडा : येथील श्री गणेश युवक क्रीडा मंडळाचा साखरचौथ गणराय.**



**पनवेल : आमदार महेश बालदी यांचे स्वीय सहाय्यक प्रवीण काळबागे यांनी डायमंड मित्र मंडळ शिरढोण येथील गौरा गणपतीचे दर्शन घेतले. या वेळी शिरढोण ग्रामपंचायतीचे सदस्य विजय भोपी, गुळसुंदे जि.प.विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, महादेव घरत, एकनाथ मुकादम, ओंमकार मुकादम, सुदर्शन घरत आणि डायमंड मित्र मंडळाचे सदस्य उपस्थित होते.**

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा सीड बॉल अंकुरण उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभाग व नेचर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.१३) सिड बॉल अंकुरण उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामध्ये विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी विविध बियांचे गोळे करून त्याचे अंकुरण केले हा पर्यावरणीय उपक्रम नुकताच पेठपाडा मेट्रो स्थानकाजवळ पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात एकूण २३ विद्यार्थ्यांनी उस्फूर्त असा सहभाग घेतला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी सिड बॉल्सची पेरणी करून परिसरात हरित पट्टा तयार करण्याचा प्रयत्न केला तसेच बीजगोल्यांच्या साहाय्याने नैसर्गिक पद्धतीने झाडांची लागवड होण्यास मदत होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.



या उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना सिड बॉल तयार करणे, योग्य ठिकाणी त्यांची पेरणी करणे आणि नैसर्गिक अंकुरण प्रक्रिया याबाबत माहिती देण्यात आली तसेच परिसरातील जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रदूषण कमी करण्यासाठी ही उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दलची जाणीव वाढविणारा ठरला तसेच उपस्थित सर्वांनी परिसर स्वच्छ ठेवण्याचा आणि झाडांची देखभाल करण्याचा संकल्प यावेळी केला.

हा पर्यावरणीय उपक्रम यशस्वीरित्या राबविल्याबद्दल महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी वनस्पतीशास्त्र विभागाचे अभिनंदन केले व पुढील काळातही असेच पर्यावरणीय उपक्रम घेतले जातील असे नमूद केले. या उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. पूजा लांजेकर वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख यांनी केले तसेच विभागातील इतर सर्व शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलला सर्वोत्कृष्ट शाळा नामांकन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सील सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या व परेश ठाकूर साहेब (चेअरमन SSRT स्कूल) यांच्या मार्गदर्शन असलेल्या शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल CBSE उलवे या स्कूलला एज्युकेशन टुडे (इंडियाज प्रीमियम एज्युकेशन मॅक्झिन) यांच्याकडून २०२५च्या बहुप्रतिक्षित महाराष्ट्र स्कूल रँकिंगमध्ये विद्यार्थी प्रगती आणि मार्गदर्शन या श्रेणीच्या अंतर्गत सर्वोत्कृष्ट शाळा हे नामांकन प्राप्त झाले आहे.




हा सन्मान स्कूलच्या शैक्षणिक उत्कृष्टता नाविन्यपूर्णता नेतृत्व आणि सर्वांगीण विकासाच्या समर्पणाचे प्रतिबिंब करतो हा पुरस्कार सोहळा मुंबई येथील द ललित हॉटेल येथे आयोजित करण्यात आला होता. सोहळ्याला उपस्तित राहून स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता भानुदास खटावकर यांनी या पुरस्काराचा स्वीकार केला.

# सेठ स्टुडिओतील आठवणी...

झूम प्रहर


दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक












निर्माता सुधाकर बोकाडेला एका गोष्टीची विलक्षण हौस मौज होती. आपल्या नवीन चित्रपटाचा मुहूर्त, त्याचे मुंबईत वा आऊटडोअर्सला असलेले चित्रीकरण आणि आपल्या यशस्वी चित्रपटाची ग्लॅमरस ओली पार्टी यात आम्हा सिनेपत्रकारांनाही सहभागी करून घेणे. अशातच एके दिवशी सेठ स्टुडिओत लॉरेन्स डिसोझा दिग्दर्शित 'साजन'च्या सेटवर त्याने आमंत्रित केले. सेटवर शिरलो तोच एका हाऊसफुल्ल प्रेक्षागृहात पाऊल पडले आणि नृत्य दिग्दर्शिका सरोज खान माधुरी दीक्षितला मै शायर हू मै तेरी शायरी (संगीतकार नदीम श्रवण. पाश्वगायिका अलका याज्ञिक) या गाण्यावरील नृत्य स्टेप्स समजावून सांगत होत्या. चित्रपटाच्या सेटवर माधुरी दीक्षितला लाईव्ह अर्थात प्रत्यक्षात नृत्य करताना पाहण्याचे मी मीडियात असल्यानेच असे काही सुवर्ण योग आले. माधुरी दीक्षित प्रत्येक स्टेपवर अधिकाधिक मेहनत करणार, कॅमेरामनशी संवाद करणार (दिग्दर्शक लॉरेन्स डिसोझा हा मूळचा छायाचित्रणकार. या चित्रपटाचा कॅमेरामन तोच होता.) लेन्स समजून घेणार, प्रचंड घाम गाळणार ही गोष्ट विशेष उल्लेखनीय.

आणि त्यात सेठ स्टुडिओ हा त्या काळातील एकमेव असा पूर्ण वातानुकूलित (एअर कंडिशन) स्टुडिओ असल्याने तुलनेत येथे कमी दमछाक. चित्रपटात काम करायचे म्हणजे मेहनत ही आलीच. त्याची चर्चा होत नाही इतकेच.

पश्चिम एक्स्प्रेस हायवेवर अंधेरीत हा स्टुडिओ होता. नेमके सांगायचे तर आज तेथे उंची गाड्यांचे शोरूम आहे. आम्ही सिनेपत्रकार व फोटोग्राफर नटराज स्टुडिओतून म्हणजे आतल्या बाजूने कॅन्टीनकडून पुढे सेठ स्टुडिओत जात असू.

बी.एस. शाद निर्मित व चेतन आनंद दिग्दर्शित 'कुदरत' (१९८१ साली मुंबईत प्रदर्शित)च्या मुहूर्त व पहिल्या चित्रीकरण सत्राने सेठ स्टुडिओचे उद्घाटन झाले. हा मुहूर्त १९७९ साली झाला. कुदरत चित्रपटात राज कुमार, राजेश खन्ना, हेमा मालिनी, प्रिया राजवंश व विनोद खन्ना यांच्या प्रमुख भूमिका. मुंबईत १९७७ साली गोरेगाव येथील अतिशय भव्य दिमाखदार दादासाहेब फाळके चित्रनगरी सुरू झाली. आणि पाठोपाठ सेठ स्टुडिओ सुरू झाला.

तोपर्यंत मुंबईतील परेल येथील राजकमल कलामंदिर स्टुडिओ, वांद्र्यातील मेहबूब स्टुडिओ, अंधेरीतील नटराज स्टुडिओ, अंधेरी पश्चिमेकडील आंबोली येथील फिल्मालय स्टुडिओ, महाकाली विभागातील कमालीस्तान स्टुडिओ, गोरेगाव पश्चिमेकडील स्वामी विवेकानंद मार्गावरील फिल्मीस्तान स्टुडिओ, साकी नाका येथील चांदिवली स्टुडिओ, चेंबूरचा आर.के. स्टुडिओ, मानखुर्दचा एसेल स्टुडिओ, ग्रॅन्ड रोडचा ज्योती स्टुडिओ अशा काही चित्रपट स्टुडिओत अतिशय मोठ्याच प्रमाणावर चित्रीकरण सुरू असे. अनेक ठिकाणचे मेकअप रुम्स हे सर्वसाधारण स्वरुपाचे असत ही वस्तुस्थिती आहे. त्यातच एकाद्या मेकअप रुमला वातानुकूलित व्यवस्था असेल तर ती आपणास मिळावी यासाठी मोठे कलाकार आग्रही असत. आपल्या चित्रपटसृष्टीत व्हॅनिटी व्हॅन ऐंशीच्या दशकाच्या अखेरीस आली आणि त्यात वाढ होण्यास बराच कालावधी लागला.

या सगळ्या पार्श्वभूमीवर पूर्णपणे वातानुकूलित असलेला सेठ स्टुडिओ ही अतिशय महत्त्वाची व एक्स्युझिव्हज गोष्ट. स्टुडिओच्या मुख्य प्रवेशद्वारावर घर वा बंगला सजावटीच्या किमती वस्तूंचे एक मोठेच शोरूम होते.

सेठ स्टुडिओतील एक अतिशय भव्य फ्लोअरवर प्रसंगानुसार सेट लावून चित्रीकरण करायचे ही सर्वसाधारण पद्धत. वरच्या मजल्यावर चित्रीकरणासाठी आणखी एक मध्यम स्वरूपाची जागा होती. येथील मेकअप रुम्स अतिशय प्रशस्त होते. अशा उत्तम सुविधा असल्यानेच या स्टुडिओत कायमच चित्रीकरणाचा राबता असे. त्यामुळेच शूटिंग रिपोर्टींगसाठी कधीही जाता येत असे. ते दिवसच वेगळे होते. चित्रपटसृष्टी व प्रसार माध्यमात विश्वासाचे नाते होते.

१९७९ सालची गोष्ट. सेठ स्टुडिओत 'कुदरत'चे पहिले चित्रीकरण सत्र सुरू असतानाच नटराज स्टुडिओत मुशीर रियाझ निर्मित व बासू चटर्जी दिग्दर्शित अपने पराये या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू होते. सेटवर शबाना आझमी, अमोल पालेकर, गिरीश कर्नाड, उत्पल दत्त, आशालता बावगावकर, भारती आचरेकर हे कलाकार चित्रीकरणात भाग घेत असतानाच आशालताना समजले, नटराज स्टुडिओच्या शेजारीच सेठ स्टुडिओ सुरू झाला असून 'कुदरत'च्या चित्रीकरणात राजेश खन्ना आहे. आशालता लहानपणापासून राजेश खन्नाच्या जबरदस्त फॅन. त्यांना मनोमन वाटले, अगदी जवळच राजेश खन्ना शूटिंग करतोय तर आपण त्याला जाऊन भेटूयात. त्यांनी आपल्या सेक्रेटरीच्या मागे तगादाच लावला. अखेर त्याने आशालता यांना सेठ स्टुडिओत न्यायचे कबूल केले. नटराज स्टुडिओतून सेठ स्टुडिओत प्रवेश करताच बाहेरच राजेश खन्नाच्या चाहत्यांची प्रचंड गर्दी पाहून त्या सुखावल्या. ते चाहते राजेश खन्नाच्या केवळ दर्शनासाठी आसुसलेले होते. राजेश खन्ना मात्र सेटवर राजकुमारसोबत दृश्य देत होत्या. आशालता सेटवर गेल्या. सेटवरच्या वातावरणाची त्यांना अर्थातच कल्पना होतीच. राजेश खन्ना या सेटवर असा काही बिझी होता की आशालता त्याला भेटू शकल्या नाहीत आणि त्यामुळे त्या बरेच दिवस नाराज होत्या, हे खुद्द आशालता यांनीच मला सांगितले.

सेठ स्टुडिओत सावनकुमार दिग्दर्शित सनम बेवफा या चित्रपटाचा झालेला मुहूर्त आठवतोय. त्या दिवसात सलमान खान व प्रेस फोटोग्राफर यांच्यातील तणावाचे प्रतिबिंब या मुहूर्तावर पडल्याचे जाणवले. या मुहूर्ताची बातमी मीडियात यायच्या आतच या चित्रपटातील नायिका बदलण्यात आली. आणि चांदनी या नवतारकेची वर्णी लागली.

सुनील शेट्टीने चित्रपटसृष्टीत पाऊल टाकले ते याच स्टुडिओत. पहलाज निहलानी निर्मित एक और भीम या नावाच्या चित्रपटाचा येथेच जंगी मुहूर्त झाल्याचे आठवतेय. सुनील शेट्टीच्या पोलादी शरीरयष्टीचा त्यात प्रत्यय आला. त्याने एका मोठ्या सेटवरून आपण चित्रपटसृष्टीत आलो आहोत याची यातून ओळख करुन दिली. प्रत्यक्षात हा चित्रपट बनलाच नाही. आपली चित्रपटसृष्टी अशा अनेक लहान मोठ्या गोष्टींसह वाटचाल करतेय. सुनील शेट्टीची ॲक्शनपॅक्ड भूमिका असलेल्या राजू मावानी निर्मित व दीपक आनंद दिग्दर्शित बलवान या चित्रपटाचा मुहूर्त व पहिले चित्रीकरण सत्र येथे रंगले. याच चित्रपटाच्या सेटवर दिव्या भारतीच्या मुलाखतीचा मला योग आला. दिव्या भारती म्हणजे आईकडून महाराष्ट्रीयन. आईचे आडनाव वाळिंबे. दिव्या छान मराठीत बोलायची यापेक्षा अतिशय रोखठोक बोलायची हे महत्त्वाचे.



या सेठ स्टुडिओत अनेकदा जाण्याचा मला योग आला. त्यातील दोन आठवणी सांगायलाच हव्यात. एक म्हणजे राजकुमार कोहली निर्मित व दिग्दर्शित 'इन्सानियत के दुश्मन'च्या वस्तीच्या सेटवर राज बब्बर व डिंपल कापडिया यांच्यावरील नृत्याच्या चित्रीकरणात डिंपल छान नाचत होती, कॅमेरा मूव्हमेंटची तिला कल्पना होती. राज बब्बरची मात्र तारांबळ उडत होती. सारखे रिटेक व्हायचे. नृत्यात तो पारंगत नव्हता हे दिसत होते. कसेबसे या गाण्याचे चित्रीकरण पार पडले, पण त्यासाठी चक्क आठ दिवस लागले.

दुसरी आठवण विशेष आहे, मनोजकुमार आपला भाऊ राजीव गोस्वामीच्या देशवासी या चित्रपटाच्या चित्रीकरणात भाग घेत होता. हेमा मालिनीही सेटवर होतीच, पण आश्चर्याचा धक्का म्हणजे, महेश भट्ट या चित्रपटात एक कलाकार म्हणून सहभाग घेत होता. ही एक वेगळीच आठवण.

शैलेंद्रसिंग व टूटू शर्मा (पद्मिनी कोल्हापूरेचा पती) यांनी निर्मिलेल्या व सचिन पिळगावकर दिग्दर्शित पद्मिनी फिल्म प्रा. लिमिटेड व नंदिनी फिल्म निर्मित भुताचा भाऊ (१९८९) या चित्रपटाचा आठवणीत राहील असा मुहूर्त याच सेठ स्टुडिओत झाला. मला या गोष्टीचा विशेष आनंद झाला होता. या चित्रपटात अशोक सराफ, सचिन पिळगावकर, वर्षा उसगावकर, लक्ष्मीकांत बेर्डे, रेखा राव, भारती आचरेकर, विजू खोटे, सतीश तुंगारे, अनंत जोग, जॉनी लिव्हर यांच्या प्रमुख भूमिका होत्या.

साधारण २००० सालापर्यंत हा सेठ स्टुडिओ कार्यरत होता. या काव्यात अनेक चित्रपटांचे मुहूर्त व चित्रीकरण येथे झाले. तो स्टुडिओ बंद झाला असला तरी आजही गुंदवली मेट्रो स्टेशन व पश्चिम एक्स्प्रेस हायवेवरून मी जातो तेव्हा हमखास माझी येथे आता असलेल्या शो रूमवर माझी नजर पडते आणि मला भुताचा भाऊ या मराठी चित्रपटाचा मुहूर्त, बलवानच्या सेटवरची दिव्या भारतीची भेट या गोष्टी आठवतातच.

---

# गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था लोकाभिमुख करण्यावर भर!

शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ आहे. शिक्षणामुळे केवळ ज्ञानसंपादन होत नाही तर आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जबाबदारी आणि आर्थिक स्वावलंबनाची वाट खुली होते. म्हणूनच शासनाने 'शिक्षण सर्वांसाठी' हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक घटकातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्यासाठी राज्य शासनाने विविध योजना आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. आजच्या युगात शिक्षण व्यवस्थेला विद्यार्थ्यांच्या गरजा, स्वप्ने आणि क्षमतांशी जोडणे ही काळाची गरज आहे. या जाणिवेतून शासनाने शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलली आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधन वृत्तीला आणि कौशल्यविकासाला चालना देणारे उपक्रम राबवले जात आहेत.

अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. राज्यात २६ फेब्रुवारी २०२४ पासून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग आरक्षणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी तसेच शासकीय सेवांमधील सरळसेवेसाठी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. यानंतर न्यायमूर्ती शिंदे समितीच्या शिफारशीनुसार मराठा समाजातील काही विद्यार्थ्यांना कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे म्हणजेच इतर मागासवर्ग प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाले आहे, मात्र या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना जात वैधता प्रमाणपत्र तातडीने न मिळाल्याने प्रवेश प्रक्रियेत अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर राज्यशासनाने अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सुरुवातीला सहा महिने, त्यानंतर तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. तरीदेखील काही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवण्यास अडचणी येत आल्याचे निदर्शनास आले आणि अनेक विद्यार्थ्यांनी तक्रारी केल्या होत्या याची राज्य शासनाने दखल घेऊन पुन्हा तीन महिन्यांची अतिरिक्त मुदतवाढ दिली आहे.

याशिवाय सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश जातवैधता प्रमाणपत्रांच्या अभावी त्यांचे प्रवेश रद्द होणार नाहीत आणि शैक्षणिक नुकसान टळणार आहे.

**तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५)**

सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग आरक्षणाच्या अंमलबजावणीनंतर राज्यातील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये मराठा विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रवेश घेतले आहेत.

**तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५)**

पदवी : १७ हजार ७७८, पदव्युत्तर : १ हजार ९२७, डिप्लोमा : ७ हजार ३५४ म्हणजेच एकूण २७ हजार ०५९ विद्यार्थी यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५मध्ये सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग आरक्षण अंतर्गत प्रवेश घेतलेला आहे.

**डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना**

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. ही योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा आणि कुणबी-जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाने सुरु केलेली ही योजना विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. सन २०२२-२३पासून या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ मिळू लागले असून उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढत असून शिक्षणाचा



दर्जा वाढविण्यास मदत होत आहे.

या योजनेंतर्गत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यार्थ्यांना केवळ शुल्क सहाय्यच नव्हे, तर वसतिगृह, पुस्तके, अभ्यास साहित्य, प्रवास भत्ता आदी विविध सुविधा पुरवल्या जातात. यामुळे मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन.आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात उभे करण्यासाठी शैक्षणिक मदत होऊन उच्च व तांत्रिक शिक्षण घेताना होणारा आर्थिक खर्चही कमी होतो त्यामुळे उच्च शिक्षणात विद्यार्थांचे प्रमाण वाढते.

**छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती**

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी लक्षित गटातील पीएच.डी. करणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या माध्यमातून विशेष प्रोत्साहन देण्याकरिता सन २०१९ या वर्षापासून छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती सुरु करण्यात आली आहे. या अधिछात्रवृत्ती अंतर्गत लक्षित गटातील ३०७८ विद्यार्थ्यांना सारथी संस्थेद्वारे सन २०२३ पर्यंत अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. आज रोजीपर्यंत ३९३ विद्यार्थ्यांची पीएचडी पूर्ण झाली असून ११० विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी नोकरी लागली आहे. या विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन विषयात पेटंट मिळाला आहे.

**विद्यार्थ्यांना देण्यात येणारी विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे अधिछात्रवृत्ती**

जेआरएफप्रमाणे (प्रथम ०२ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती युजीसी निकषानुसार ५ लाख ५३ हजार ३००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ४६ हजार १०८ आहे तसेच जेआरएफप्रमाणे (२ वर्षानंतर पुढील ३ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती ६ लाख २९ हजार ८००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ५२ हजार ४८३ देण्यात येते. अधिछात्रवृत्ती अंतर्गत अंतिमरित्या निवड झालेल्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य हे सारथीकडून ज्या रोजी अवार्ड लेटर दिले जाईल, त्या तारखेपासून पुढे पीएचडीकरिता पाच वर्ष किंवा उमेदवार संशोधनासाठी विद्यापीठ महाविद्यालय/संस्था येथे रूजू झालेला असेल. (विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेच्या अहवालातील नमूद रुजू तारीख), या वेळी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून उमेदवाराच्या फक्त उर्वरित कालावधीसाठी पीएचडीच्या फक्त उर्वरित कालावधीसाठी एकूण पाच वर्षांच्या कालावधीच्या आधारे किंवा उमेदवारांनी ज्या तारखेस संशोधन अहवाल सादर केला असेल, यापैकी जी अगोदरची तारीख असेल त्या तारखेपर्यंत अनुज्ञेय राहील. निवड झालेल्या लाभार्थ्यांना रक्कमे संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे अंतर्गत होणाऱ्या बदलानुसार अधिछात्रवृत्ती अनुज्ञेय राहील.

अधिछात्रवृत्ती योजनेंतर्गत सन २०१९मध्ये पात्र विद्यार्थी ५०३, पीएचडी घेतलेले विद्यार्थी २४६, नोकरी लागलेले विद्यार्थी ७४ आहेत. सन २०२०मध्ये पात्र विद्यार्थी २०४, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ८०, नोकरी लागलेले विद्यार्थी १८ आहेत. सन २०२१मध्ये पात्र विद्यार्थी ५५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ६४, नोकरी लागलेले विद्यार्थी १० आहेत. सन २०२२मध्ये पात्र विद्यार्थी ८५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ४, नोकरी लागलेली विद्यार्थी १ आहेत, तर सन २०२३मध्ये पात्र विद्यार्थी ९६९ आहेत.

**परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती**

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या जातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठात प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असून आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीतील मुला-मुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी/पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी क्यूएस वर्ल्ड रँकिंगमध्ये २००च्या आत रँकिंग असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेतील अशा मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील एकत्रितपणे ७५ विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. ही योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत 'सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना' या नावाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४पासून राबविण्यात येत आहे.

सारथी संस्थेमार्फत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील विद्यार्थ्यांकरिता डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती सन २०२२-२३पासून २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३पासून राबविण्यात येत आहे.

देशाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत भारतातील शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर ५०%पर्यंत नेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत. गुणवत्तापूर्ण शैक्षणिक बदल करून राज्यातील शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख केली जात आहे.

**-काशीबाई थोरात-धायगुडे,**
**विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय**

---

# कुस्तीगीर-प्रशिक्षक हरिश्चंद्र बिराजदार

हरिश्चंद्र माधव बिराजदार हे पहिलवानी कुस्ती खेळणारे मराठी कुस्तीगीर व कुस्ती-प्रशिक्षक होते. त्यांचा आज स्मृतिदिन. स्कॉटलंड येथे झालेल्या इ.स. १९७० सालातल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये त्यांनी सुवर्णपदक पटकावले होते, तर इ.स. १९७२ साली त्यांनी भारतातील राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत अजिंक्यपद जिंकून रुस्तम-ए-हिंद किताब मिळवला होता. खेळाडू म्हणून कारकिर्द संपल्यावर ते कुस्ती-प्रशिक्षक म्हणून काम करत होते. पुण्यातील गोकुळ वस्ताद तालमीत ते कुस्ती शिकवत असत.



५ जून १९५० रोजी महाराष्ट्राच्या वर्तमान लातूर जिल्ह्यातल्या निलंगा तालुक्यात रामलिंग मुदगड या गावी हरिश्चंद्र बिराजदारांचा जन्म झाला. त्यांचे वडील पहिलवान होते. हरिश्चंद्रांच्या वयाच्या पाचव्या वर्षी त्यांची आई निवर्तली. वडिलांनी कुस्ती खेळण्यातले हरिश्चंद्रांच्या अंगचे गुण हेरून त्यांना सन १९६५च्या सुमारास तालीम करण्यासाठी कोल्हापुरास गंगावेस तालमीत धाडले. १९६८च्या हिंद केसरी स्पर्धेत रौप्यपदक मिळाले, तर १९६९मध्ये दादू चौगुले याला हरवत त्यांनी महाराष्ट्र केसरी किताब पटकावला. त्याच वर्षी कानपूर येथे झालेल्या हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेत त्यांनी हिंदकेसरी किताबही जिंकला.

स्कॉटलंडातील एडिंबरा येथे झालेल्या १९७० सालच्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये बिराजदार यांनी कुस्तीतले सुवर्णपदक जिंकले. याच वर्षी कॅनडा एडमंटन येथे झालेल्या जागतिक कुस्ती स्पर्धेत सहभाग घेतला. १९७२ साली वाराणसी येथे झालेल्या भारतातल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत त्यांनी नेत्रपाल नावाच्या दिल्लीच्या कुस्तीगिराला हरवत रुस्तम-ए-हिंद किताब पटकावला. १९७३मध्ये मुंबईत झालेल्या वरिष्ठ राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. १९७७ साली बेळगाव येथे झालेल्या मैदानी कुस्तीच्या मुकाबल्यात त्यांनी दिल्लीच्या बिर्ला आखाड्याच्या सत्पाल मल्लास हरवण्याचे आव्हान जिंकले.

हरिश्चंद्र बिराजदार यांनी अनेक मान-सन्मान मिळवले. २००६मध्ये मेजर ध्यानचंद पुरस्कार, १९७१ साली शिवछत्रपती पुरस्कार, १९९८-९९मध्ये दादोजी कोंडदेव पुरस्कार, २००० साली राष्ट्रीय विशेष पुरस्कार, ११९४मध्ये जागतिक मराठी परिषद यांचा समावेश आहे. अशा या नामवंत कुस्तीपटूचे १४ सप्टेंबर २०११ रोजी निधन झाले.

(साभार: इंटरनेट)

# माथेरान घाटातील खड्ड्यांमुळे अपघात

## पाच वाहनांमधील मोठी धडक थोडक्यात टळली



**नेरळ : प्रतिनिधी**

माथेरान घाटातील रस्त्यावर पडलेले खड्डे आता अपघाताचे जाळे ठरत आहेत. जुमापट्टी येथील कुप्रसिद्ध 'एस-टन' वळणावर एकाच वेळी पाच ते सहा वाहने समोरासमोर येऊन थांबली, काही वाहने चढताना मागे सरकली तर उतरणारी वाहनं खड्ड्यांमधून बाहेर काढण्यासाठी धडपड करत होती. सुदैवाने जीवितहानी टळली, पण मोठा अपघात होण्याची चिन्हं ठळकपणे दिसून आली.

माथेरान घाटात मागील मान्सूनपूर्वीची डोंगरावरून वाहिलेली माती दगडाने नैसर्गिक नाले बंद झाले आहेत. ठिकठिकाणी हे दृश्य असून नाले सफाई प्रशासनाने न केल्याने परिणामी रस्त्यावरून पाणी वाहत आहेत, यामुळे रस्त्यावरील डांबर वाहून जाऊन रस्त्याची चाळण झाली काही ठिकाणी खड्डे पडून नाले तयार झालेत आणि खडी रस्त्यावर पसरली आहे. घाटातील जुनापट्टी या एस टन या वळणावर निसर्गिक नाल्यातील पावसाचे पाणी रस्त्यावर वाहत आहे. नाले वेळेत साफ न केल्याने हे पाणी रस्त्याच्या मधोमध साचून मोठे खड्डे तयार झाले. परिणामी वाहनचालकांसाठी जीवघेणा प्रसंग निर्माण झाला. पर्यटकांनी व स्थानिकांनी याकडे लक्ष वेधूनही प्रशासनाने नेहमीप्रमाणे कानाडोळाच केला आहे. आजचा प्रकार तर फक्त सुरुवात आहे. खड्डे भरले नाहीत आणि नाले स्वच्छ केले नाहीत तर या घाटात कधीही मोठ्या प्रमाणावर अपघात होऊन जीवितहानी होणार, यात शंका नाही.

स्थानिक नागरिक व वाहनचालकांचा संताप उसळला आहे. माथेरानसारख्या जागतिक दर्जाच्या पर्यटनस्थळी जाणाऱ्या घाटरस्त्यांची ही दुर्दशा हे रेल्वे व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणाचे मूळ परिणाम आहेत. पर्यटकांचे प्राण धोक्यात येत असल्याने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी नागरिक प्रशासनाकडे करीत आहेत.

पर्यटन हंगामाच्या उंबरठ्यावर घाटातील खड्डे तातडीने बुजवले नाहीत, नाले साफ केले नाहीत तर स्थानिक नागरिकांनी मोठ्या आंदोलनाचा इशारा दिला आहे.



अलिबाग : तालुक्यातील कुरकुंड येथे जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत नवीन अंगणवाडी उभारण्यात आली आहे. या इमारतीचे उद्घाटन पनवेल मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी झाले. या नवीन अंगणवाडी इमारतीमुळे या गावातील चिमुकल्यांना विद्यार्थ्यांना अत्याधुनिक पद्धतीने शिक्षणाचा अनुभव घेता येणार आहे. इमारतीच्या उद्घाटनावेळी माजी आमदार पंडित पाटील, जि.प.चे माजी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, परशुराम म्हात्रे, विश्वास जोशी, संकेत जोशी आदी उपस्थित होते.

# टेमपाले येथे १७ सप्टेंबरला ईद-ए-मिलादनिमित्त रक्तदान शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

प्रेषित मोहम्मद सर्वांसाठी, रक्तदान हे जीवनदान व सर्वश्रेष्ठ दान असून आपल्या रक्ताच्या एका थेंबाने एखाद्याचा जीव वाचू शकतो हि समाज सेवी भावना नजरेसमोर ठेऊन माणगाव तालुक्यातील जमातुल मुस्लिमीन टेमपाले यांच्या वतीने ईद-ए मिलाद -उन-नबीनिमित्ताने शासकीय रुग्णालय अलिबाग रक्तपेढी यांच्या विशेष सहकार्याने बुधवार १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २ या वेळेत टेमपाले या ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्त दात्यांनी सहभाग घेऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

रक्त हे कृत्रिम रित्या तयार होत नाही तर नैसर्गिक रित्या तयार होत असते. मानवाला प्रसंगी मानवाच्याच रक्ताची गरज भासते. रक्तदान करणाऱ्या रक्तदात्याचे एकावेळी फक्त ३५० मिली एवढे रक्त घेतले जाते. रक्त दान हेच खरे सर्वश्रेष्ठ दान असून आपण केलेले रक्तदान हे २४ ते ४८ तासात भरून निघत असते. दर तीन महिन्यांनी रक्तदात्याला रक्तदान करता येते. रक्त हे असे आहे कि यामध्ये जात - पात पाहिली जात नाही. रक्ताचा रंग हा सर्व मानव जातीचा लालच असून मानवी रक्तच मानवाच्या उपयोगी पडत असते. आपण केलेल्या रक्तदानामुळे एखाद्याचे जीव वाचू शकते. प्रेषित मोहम्मद पैगंबर यांनी जगाला शांतीचा संदेश दिला. त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.

प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचा जन्म दिवस म्हणून ईद-ए मिलाद साजरी केली जाते. या ईद निमित्त माणगाव तालुक्यातील टेमपाले येथील मुस्लिम बांधवानी एकत्रित येत आपण समाजाचे काहीतरी देणे करी लागतो हा उद्देश नजरेसमोर ठेऊन सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सर्व धर्म समभाव मानून टेमपाल येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिराची जोरदार तयारी आयोजकांतर्फे करण्यात आली आहे.

# बारशिव-काशीद रस्त्यावरील खिंडीत बस व बुलेटचा अपघात

## तरुण गंभीर जखमी



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत बारशिव-काशीद रस्त्यावरील खिंडीत एस.टी. बस व बुलेटचा अपघात झाला. या घटनेत बुलेटस्वार तरुण गंभीर जखमी झाला आहे.

रेवदंडा पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी गजानन किसनराव मोरे (वय ३९, रा. विलेगाव ता. अहमदपूर, जि. लातूर) हे त्यांच्या ताब्यातील एस.टी. बस (क्र. एमएच १४/एमएच ३८८२) प्रवाशांसह दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी साधारण १२ वाजण्याच्या सुमारास रेवदंडा बाजूकडून मुरुडकडे घेऊन जात होते. या वेळी समोरून येणारी बुलेट (एमएच ०६ सीटी ४९४३) भरधाव वेगात व चुकीच्या बाजूने येऊन बसला धडकली.

या धडकेत बुलेटस्वार आरोपी कल्पेश गोपीनाग देवघरे (वय ३७, रा. दिघी सर्वे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड) गंभीर जखमी झाला असून त्याच्या उजव्या गुडघ्याला तसेच दोन्ही हातांना दुखापत झाली आहे. तसेच अपघातात बुलेट व एस.टी. बसचे नुकसान झाले आहे. या घटनेप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले करीत आहेत.






पनवेल : झेप फाऊंडेशनच्या वतीने माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई पाटील यांच्या ७८व्या जयंतीनिमित्त जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्व. मीनाक्षीताई पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व उपस्थितांशी संवाद साधत मिनाक्षीताईंच्या स्मृतींना उजाळा दिला. या वेळी खासदार धैर्यशील पाटील, माजी आमदार पंडित पाटील, जि.प.चे माजी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, महेश मोहिते, चित्रा पाटील, हेमा मानकर, वंदना म्हात्रे, राजेश मपारा, परशुराम म्हात्रे, विश्वास जोशी, संकेत जोशी, सरपंच प्राजक्ता म्हात्रे आदी उपस्थित होते.

# खोपोली येथे रिझर्व्ह बँकेचे जनजागृती शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली येथे भारतीय रिजर्व बँक वित्तीय समावेशन आणि विकास विभाग मुंबई प्रादेशिक कार्यालय वित्तीय समावेशन योजनांसाठी शिबिर आणि पुनर्बांधणी शिबिराचे आयोजन महाराजा मंगल कार्यालयात विक्रम साब्ळे फाउंडेशन यांच्या सहकार्याने करण्यात आले होते.



या शिबिरात भारतीय रिजर्व बँकेचे संचालक नीरज निगम आणि मुंबई क्षेत्रीय भारतीय रिजर्व बँकेचे कार्यालयाचे सुमन रे यांची विशेष उपस्थिती लाभली. या शिबिरातील उपस्थित बँकेच्या खाते धारकांना बँकेच्या माध्यमातून विविध योजनाची माहिती देण्यात आली. तसेच री केवायसी, पीएमजेडीवाय खाते, रुपे कार्ड आणि नामांकनाचे महत्त्व सामाजिक सुरक्षा योजना, डिजिटल फसवणूक जागरूकता या संदर्भात देखील बहुमोल मार्गदर्शन उपस्थित मान्यवरांकडून करण्यात आले.

भारतीय बँकेचे मुख्य महाव्यवस्थापक बँक ऑफ इंडियाचे सुनील कुमार शर्मा, बँक ऑफ महाराष्ट्राचे मुख्य महाव्यवस्थापक दिनकर संकपाळ, बँक ऑफ बडोदा चे जनरल मॅनेजर सुनील कुमार शर्मा, यु बी आय बँकेचे जनरल मॅनेजर दिलीप मिश्रा तसेच रायगड जिल्हा अग्रणी प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी यांचे सह खोपोली परिसरातील विविध बँकांचे व्यवस्थापक व अधिकारी प्रबंधक व खोपोली व परिसरातील बचत गटाचे मोठ्या प्रमाणात महिलावर्ग उपस्थित होते.

# तारापूर येथील विघ्नहर्ता मंडळाच्या साखरचौथ गणपती बाप्पाला निरोप

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील तारापूर (चौक) येथील भाद्रपद महिन्यातील साखर चौथ गणरायाला वाजत गाजत निरोप देण्यात आला.



अनंत चतुर्दशीनंतर चार पाच दिवसांनी येणाऱ्या संकष्टी चतुर्थीला (साखर चतुर्थीला) साखर चौथ गणरायाचे आगमन होते.तारापूर येथील विघ्नहर्ता मंडळाचा गणपती अतिशय उत्साहात वाजत गाजत आला. गणेशमूर्तींची स्थापना झाल्यावर अभिषेक, पूजा आरती करण्यात आली. साखर चौथ गणरायाला अनेक नवस बोलले जातात, पावलेले नवस फेडण्यासाठी भाविकांनी रांग होती. चौक परिसरातील अनेक भाविकांनी येऊन दर्शन घेतले.आज चौथ्या दिवशी गणरायाला निरोप देण्यात आला.

कोकणात साखर चौथ गणपती आणण्याची परंपरा आहे. काही ठिकाणी दिवस, काही अडीच दिवस, काही ठिकाणी चार तर सात दिवस ठेवले जातात, तर २१ दिवसांचे गणपती देखील आहेत. या साखर चौथला बसणाऱ्या गणपतींना गौरा गणपती असेही म्हणतात. चौकचे प्रभारी विशाल पवार यांनी दर्शन घेऊन आरती केली. गणरायाला निरोप देताना पारंपरिक वाद्य वाजवून गणरायाला निरोप देण्यात आला.

# माणगावात सप्टेंबरमध्येच धुक्याची चाहूल



## पावसाच्या अंदाजात हवामानाचा अनपेक्षित बदल

**माणगाव : बातमीदार**

माणगांव तालुक्यात गेल्या दोन-तीन दिवसांपासून पहाटेच्या वेळी दाट धुक पडताना दिसत होते. त्यामुळे वातावरणात गारव्याची जाणीव होऊ लागली असून, सप्टेंबरमध्येच हिवाळ्याची चाहूल लागल्याचा अनुभव ग्रामस्थांना येत आहे. दरम्यान, हवामान खात्याने ११ ते १७ सप्टेंबर या कालावधीत राज्यात सलग पावसाचा अंदाज वर्तविल्यानुसार शनिवार दि.१३ रोजी दुपारचे सुमारास त्याने पुन्हा एकदा जोरदार सुरुवात केली आहे.

माणगांवात दोन दिवस धुक्याचे आगमन झाल्याने स्थानिक पातळीवरील हवामानाचे स्वरूप थोडे वेगळे भासत आहे. मे महिन्या पासूनच सतत सुरू असलेल्या पावसाने मध्येच अल्पशी विश्रांती घेत आकाशात अधूनमधून सूर्यदर्शन झाले, तर मधेच ढगाळ वातावरणात कधी उष्णता तर मध्येच गारवा कायम आहे. हवामान विभागाच्या मते, सध्याच्या काळात समुद्रसपाटीवर आर्द्रतेचे प्रमाण जास्त असल्यास सकाळच्या वेळी धुक्याचे प्रमाण वाढते. अशा वेळी थंडीची हलकी चाहूल लागते. यामुळेच माणगांवात गेले दोन तीन दिवस दिवाळीपूर्वीच थंडीची झुळूक जाणवू लागल्याचे दिसून येत आहे. परिस्थिती पाहता, पुढील काही दिवस पावसासोबतच सकाळी गारव्याचा अनुभव घेण्याची शक्यता जाणकारांकडून वर्तविली जात आहे.

# भाजपच्या अनिकेत निकम यांच्याकडून शाळेला बेंच

**चौक : प्रतिनिधी**

आसरे शाळेतील विद्यार्थी यांना शाळेत बसण्यासाठी २० बेंच माजी उपसरपंच अनिकेत निकम यांनी दिल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

रायगड जिल्हा परिषद शाळा आसरे येथील विद्यार्थी यांना शाळेत बसण्यासाठी बेंच अपुरे पडत होते. याबाबत माजी उप सरपंच कु.अनिकेत उल्हास निकम यांना शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक यांनी अवगत केले, माजी उपसरपंच अनिकेत निकम यांनी शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली, शिक्षक दिनाचे औचित्य साधून त्यांनी २० नवीन बेंच आसरे शाळेतील विद्यार्थ्यांना भेट म्हणून दिले.

अनिकेत निकम हे आपल्या दुर्गम भागातील विद्यार्थी यांना शैक्षणिक संधी उपलब्ध व्हावी त्यासाठी ते प्रयत्न करीत असतात. आसरे सरपंच बळीराम जांभळे, ग्रामपंचायत अधिकारी गोकुळदा राठोड, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक व पालकांनी त्यांचे आभार व्यक्त केले.



# पावसाला पुन्हा जोरदार सुरुवात

## शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ

**चौक : प्रतिनिधी**

पावसाने जोरदार हजेरी लावल्याने शेतकरी चिंतातुर झाले आहेत, हातातोंडाशी आलेला घास हिरावून जात असल्याची भीती वाटत आहे.

हवामान खात्याने दिलेल्या वृत्तानुसार आज पावसाने जोरदार हजेरी लावली आहे, कोकणात प्रामुख्याने भात पिके घेतली जातात. अवकाळी पावसाने थैमान घातले होते, त्यातून येथील शेतकरी थोडाफार स्थिरावला होता, भात पिके फुलवऱ्यात आली आहेत, गणपती काळात आणि त्या नंतर थोडी उघडीप मिळाली होती, तयामुळे भात पिकांनी जोर पकडला होता, काही हळव्या भातांनी फुलवऱ्यात येण्यास सुरुवात केली आहे, आता सतत पडणाऱ्या पावसाने हा फुलोरा झडण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी चिंतातुर झाला आहे. मुळातच पहिले मोठे नुकसान झाले असल्याने आता संकट नको, अशी प्रार्थना करण्यात येत आहे.

# तळा तालुक्यात १७ सप्टेंबरपासून सेवा पंधरवडा

**तळा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातंर्गत सेवा पंधरवडा साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर, २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीमध्ये सेवा पंधरवाडा साजरा करण्यात येणार आहे.

ग्रामीण भागातील नागरीकांच्या दैनंदिन अडचणी दूर करण्यासाठी आणि पारदर्शक प्रशासन निर्माण करण्यासाठी तळा तालुक्यातील सर्व गावांमध्ये अभियान राबविण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत तीन टप्प्यात कामे केली जाणार आहेत. पहिल्या टप्प्यात पाणंद व शिवरस्त्यांचे सर्वेक्षण करुन क्रमांक देणे, नोंदी करणे आणि मोजणी करणे यावर भर दिला जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात सर्वांसाठी घरे या योजनेसाठी उपलब्ध सरकारी जमीनीवरील २०११ पूर्वीचे निवासी घरे नियमानुकूल करणे आणि पात्र लाभार्थ्यांना पट्टे प्रदान करणे याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

तिसऱ्या टप्प्यात मा. जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक अर्थसहाय्य लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याचे काम १०० टक्के पूर्ण करणे. आयुष्यमान भारत कार्ड मोहिम घेणे. स्मशानभूमीत जाणे-येणेकरीता रस्ता उपलब्ध असलेबाबत खातरजमा करणे, तसेच त्यांचे जीवोटंग करणे यासारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या योजनांचा लाभ सामान्य जनतेला होणार आहे.

# आणीबाणीमध्ये रायगड जिल्ह्यातील संघकार्य

आणीबाणी: त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २५ जून १९७५ ला देशात आणीबाणी घोषित केली आणि दडपशाहीचा वरवंटा देशांमध्ये फिरू लागला. संघ बंदी ही आली, संघाच्या आणि विरोधी पक्षाच्या प्रमुख नेत्यांचे अटक सत्र सुरू झाले. कोणाचेही वृत्त बातमी प्रकाशित करण्यावर सेंसर बंदी लागू झाली. सगळ्या वर्तमानपत्रांचे कार्यालयामध्ये सरकारी माणूस थांबू लागला, कोणतीही बातमी त्याने मंजूर केल्याशिवाय छापता येत नसे. इतकेच नाहीये तर गावोगावी असलेल्या छापखान्यांमध्येही बंधने आली, महसूल खात्याचे लेखी परवानगी असल्याशिवाय काहीही छापले तर प्रेसला टाळे लागत होते. संघबंदी आल्यामुळे सरसंघचालकांनी अनिश्चित काळासाठी संघ विसर्जित केला. त्यामुळे संघाचे दैनंदिन शाखेचे सर्व व्यवहार बंद झाले. सर्व सूचना प्रत्यक्ष भेटून द्याव्या लागत असत, फोन वगैरे तेव्हा फारसे नव्हतेच, पोस्ट ऑफिस मध्ये फोन असे.

संघ विचारांच्या मंडळींची स्थानिक पातळीपर्यंत अटक सत्र सुरू होणार असे लक्षात आले. संघाच्या सर्व कार्यालयांवर धाडी टाकून त्यांना सरकारी सील लावण्यात आले. त्यामुळे सर्व स्वयंसेकांना सूचना होत्या की त्यांनी आपापल्या डायऱ्या नष्ट कराव्या कोणत्याही स्वयंसेवकांची यादी मिळणार नाही याची काळजी घ्यावी. सर्वप्रचारांना भूमिगत होण्याच्या सूचना होत्या, संघाची ओळख पटेल असे साहित्य घरात ठेवू नये अशाही सूचना होत्या, आपल्या पेण शहरांमध्ये एक गंमत झाली होती, संघाचे कार्यालय पहिल्या मजल्यावर होते आणि तळ मजल्यावर आपले एक कार्यकर्ते राहत होते. त्यांचे घरातून पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी जिना होता, त्यातून पहिल्या मजल्या वरील संघ कार्यालयात जाता येत असे, संघ कार्यालयाला बाहेरून सरकारी सील असे. अधूनमधून पोलीस येऊन तेथील सिल चेक करून जात असत, परंतु ही घरातली वाट मात्र चालू होती, त्यामुळे कोणतेही अडचणीचे वाटणारे साहित्य त्या वाटेने संघ कारल्यामध्ये एकदम सुरक्षित ठेवता येत असे. बाहेरच्या वातावरणात दहशत एवढी होती की कोणत्याही कार्यकर्त्याला आपल्या घरी संघाविषयी काहीही विचारविनीमय करायची भीती वाटायची. अशावेळी आम्ही त्यासाठी छूप्या पद्धतीने संघ करण्याचाच वापर करत असू.

जसा काळ जाऊ लागला, सुरुवातीचे अटकसुद्धा ही थांबले, तसतसे पुढे काय हा प्रश्न निर्माण होऊन काही प्रमाणामध्ये बैठका पुन्हा सुरू करणे भाग होते. त्यावेळेस माझ्यासारख्या तरुण कार्यकर्त्यांची नावे पोलिसांच्या लिस्ट वरती नसल्यामुळे अनेक जोखमिची कामे करण्याची वेळ आमच्यावर येत असे. अशा दोन जिल्हा बैठका स्मरणात आहेत. एक पनवेलला झाली होती तर दुसरी नागोठण्यात झाली होती, बैठका घेताना खूपच काळजी घ्यावी लागत होती, ठिकाण निवडण्यापासून काळजी घ्यावी लागायची एकदम यायचे नाही किंवा दोघांनी यायचे, मध्ये थोडा थोडा वेळ गेला की आणखी एक दोघांनी यायचे, जेणेकरून परीसरातील कोणालाही संशय येऊ नये, हसणे, खीदळणे मोठ्याने बोलणे सर्व काही वर्ज, बाहेरून चहा पाणी इत्यादी काहीही मागवायचे नाही. जेणेकरून संशय बळावेल असे काहीही करायचं नाही. कमीत कमी वेळात बैठक संपवायची, बाहेर पडताना सुद्धा एक एकट्याने थोडा थोडा वेळाने बाहेर पडायचे. पनवेलची बैठक नीट पार पडली, नागोठणाच्या बैठकीला रात्री दहा नंतर पोहचायचे आणि पहाटे बाहेर पडायचे असे ठरले होते, बाकी सर्व नियम वरील प्रमाणे होतेच. पण का कोण जाणे बहुदा बैठकीतून वेगवेगळे बाहेर पडलेले असलो तरी एसटी स्टँड वर एसटी साठी सगळे एकत्रच होतो, छोट्या गावांमध्ये हे लपून जाऊ शकले नाही. आणि नागोठण्याचे कार्यकर्ते श्री बंडू भाटे यांना पोलिसांनी पकडले, त्यांचा आनंन्वीत छळ सुरू झाला. कानावर एवढे फटके बसले होते की ते बहिरे झाले होते. तरीदेखील त्यांचे कडून कोणतेही माहिती पोलिसांना मिळू शकली नाही. सुरुवातीच्या काळातच रायगड जिल्ह्यात भरपूर लोक मिसा खाली पकडले गेले होते. काहींची नावे आठवतात, त्यामध्ये उरणचे संघ चालक पटवर्धन (नंतर त्यांचे जेलमध्येच निधन झाले.) पनवेलचे राजाभाऊ वैशंपायन, व्यंकटेश जोशी, जयंतराव भाटे, शंकरराव चोरघे, डॉ. दिघे, पेणचे शशिकांत करंदीकर, रोयाचे माधवराव भावे महाडचे बाळासाहेब गांगल वसंतराव भागवत अण्णा जोगळेकर शांताराम आडिवरेकर, बगाराम पंत पूरोहीत, बाळा काका जोशी, बापूशेठ ओक. धामणकर तसेच पोलादपूरचे श्री दत्तोपंत साळुंखे वगैरे मंडळी यांचा समावेश होता. त्यावेळेस जिल्हा प्रचारक म्हणून श्री गजानन ऊर्फ बाळासाहेब दीक्षित होते, त्यांची बोलण्याची व हाताची हालचाल करण्याची विशिष्ट स्टाईल होती त्यामुळे तेदेखील पुढे मुंबईत पकडले गेले.




वास्तविक सर्वच कार्यकर्त्यांना आपापल्या डायऱ्या नष्ट करा कोणाचेही नावे आपल्याजवळ ठेवू नका असे सूचना होत्या, तथापि बाळासाहेब पकडले गेले तेव्हा त्यांचे जवळ डायरी अनेकांच्या नावे पत्ते फोन नंबर इत्यादी गोष्टी सापडल्या, पोलिसांपैकी आपल्याबद्दल सहानुभूती वाटणारे काहीजण होते. त्यांच्याकडून आपल्याला संबंधितांना सावध करण्याची काही दिवस घराबाहेर राहण्याची तसेच घरात काहीही सापडणार नाही याची काळजी घेण्याची सूचना मिळाल्या. जिल्ह्यामध्ये खूप धावपळ उडाली माझ्यासकट काही कार्यकर्त्यांना भरपूर धावपळ करून सर्वांना सावध करण्याचे काम करावे लागले. पहिल्या धकाधकीचा काळ संपल्यावर थोडी स्थीरता आली, संघाकडे प्रमुख्याने दोन-तीन प्रकारची कामे होती. प्रथमतः बाहेर असलेल्यांपैकी कोण कोण घाबरले आहेत आणि कोण कोण हिम्मत धरून संघर्षाला तयार आहेत त्याचा शोध घेणे. दुसरे म्हणजे मिसा खाली जी मंडळी बंदिवान आहेत त्यांचे मनोबल कायम राखणे, कोणीही माफी मागून बाहेर येणार नाही असे पाहणे, त्यासाठी स्वाभाविकपणे त्यांच्या कुटुंब परिवाराचे मानसिक व आर्थिक स्वास्थ्य टिकवणे गरजेचे होते, मिसाबंदींपैकी काहींची आर्थिक स्थिती बरी असली तरी काहींची फारच हालाखीची स्थिती होती आणि हे जेल प्रकरण केव्हा संपेल त्याचे काही गणित नसल्यामुळे त्यांचे पूरवठादार उधारीवर माल देण्यास ना खुश असायचे त्यामुळे अशा सर्वांकडे नियमितपणे अर्थ पुरवठा होईल असे पाहणे आवश्यक होते आणि सर्वांचा धीर व हिम्मत कायम राहावे म्हणून त्यांचेकडे नियमित भेटणे व धीर देणे हे चालू होते. पुन्हा या सर्व गोष्टी नजरेत न येता कराव्या लागत होत्या, अन्यथा असे करणाऱ्यांवर पुन्हा तुरुंगात जाण्याचे संकट येण्याची शक्यता होती.

व्यवसायी व नोकरदार कुटुंबातील स्वयंसेवक हे एकूण वातावरणातील दहशतीमुळे ओळख दाखवायला घाबरत असत अनेक जण तर कार्य करत्यांची नजर व भेट टाळण्यासाठी नेहमीचा रास्ता ही बदलत होते, पण याही काळात निर्भीडपणे सावधपणे काम करणाऱ्यांची संख्या ही चांगली होती, अजून संसारात न अडकलेले नोकरदादार व व्यवसायी यांचेवर प्रामुख्याने जबाबदारी होती. विद्यार्थी वर्गाचा ही सहभाग असायचा, पण त्यांना घरून सणसणीत दम मिळत असे. त्यामुळे सक्षम कार्यकर्त्यांची खूपच वानवा होती. आणि तिसरे काम म्हणजे वर्तमान पत्रे रेडिओ वगैरे माध्यमे एकतर्फी सरकारी बातम्या देत असल्यामुळे आणीबाणी विरुद्ध आवाज उठवण्यासाठी जनजागृती करणे, खऱ्या बातम्या लोकांपर्यंत पोहचणे ही व्यवस्था करणे, आणि हे सर्व पोलिसांची व स्वार्थासाठी खबर्यांचे काम करणाऱ्यांची नजर सुकून करावे लागायचे, चिठ्ठी चपाटी लिहीत पत्र हे सर्व कटाक्षाने टाळावे लागत होते, त्यामुळे छोट्या छोट्या गोष्टीसाठी सुद्धा प्रवास हाच एकमेव मार्ग होता, व आर्थिक स्तरावर तर सगळा आनंदच होता. त्यामुळे जनजागृती हस्त पत्रक पोस्टर्स इत्यादीचा उपयोग करावा लागत असे. हस्त पथक छापून घेणे शक्यच नव्हते म्हणून त्यावेळी सायकलो स्टाईल म्हणून एक व्यवस्था होती, पण ते मशीन ठराविक लोकांकडेच असे त्यांचेकडून करून घेणे म्हणजे आयतेच पोलिसांच्या तावडीत जाण्यासारखे असे. त्यामुळे फार काळजीपूर्वक करावे लागे. मी त्या वेळेला महाडला होतो, महाडला वामनराव जोशी म्हणून प्राथमिक शिक्षक होते, मोठे हिम्मतीचे होते. त्यांना प्रश्नपत्रिका काढण्यासाठी साईक्लोस्टाईल मशीन लागत असे, म्हणून त्यांनी स्वतःचे मशीन घेतले होते, त्याच्यावर फार सावधगिरीने पत्रके काढावी लागत.

साधारणपणे १५ ते २० दिवसांनी एखादे पत्रक निघत असे. ही वाटणे म्हणजे पण मोठे कौशल्याचे काम असे, पण लोकांमध्ये याबद्दल प्रचंड उत्सुकता असे. मग दहा-बारा जणांचा एक गट पहाटेचे वेळी उठून एकेका गल्ली एक एक जण पत्रक घडी करून बंद दरवाजा फाटीतून आज सरकवून देत असे पोलिसांची गस्त रात्री उशिरापर्यंत चालत असे पण पहाटे सामान्यतः गस्त नसायची. तसेच सिनेमागृहामध्ये पाच सहा स्वयंसेवक विखरून बसत असत, आणि सिनेमा संपल्यावर पण दिवे लागायच्या आधी जे काय दोनच्यार क्षणाचा वेळ मिळत असेल तेवढ्या वेळात ती पत्रके उधळून दिली जात असत, दिवे लागल्यावर सर्व प्रेक्षकांची ते मिळवण्यासाठी सावधपणे झुंबड उडत असे, पत्रक उधळणारे कार्यकर्तेही ते मिळवण्यासाठी त्या झुंबड मध्ये सामील होत असत, भित्तिपत्रक लावण्यासाठी मोठ्या आकाराचे कार्डबोर्ड जमा करावे लागत पेपरज्या पार्सल मध्ये येत असतात त्या पार्सलचे पेपर आम्ही जमा करत असू. आधी ते कापून घेऊन मग डिंक तयार करून तो एका बाजूने सर्व कागदाला पूर्ण लावत असू. कागद पूर्ण वाळवून ठेवत असू, मग तो वाळलेला कागद दुसऱ्या बाजूने लिखाणासाठी वापरला जात असे. सामान्यपणे आणीबाणी रद्द करा वगैरे सारख्या घोषणा त्यावर लिहिल्या जात असत. नंतर तिघा चौघांचा एक ग्रुप करून घडी घातलेली भित्तीपत्रके व पाण्याची बाटली घेऊन पहाटेच्या वेळी गल्लीच्या दोन टोकांना दोघांना पहारेकरी उभे करून गल्लीमध्ये पोस्टरला सुकलेल्या डिंकावर पाणी मारून ते चटकन भिंतीवर दाबून चिकटवले जाई. सकाळी लोक उत्सुकतेने जमून वाचत असत, पोलिसांना ते कशाने तरी खरडऊन काढावे लागत असे, या सर्व गोष्टीमुळे पोलीस खूप चिडत. मग काही दिवस गप्प बसावे लागत असे.

अशा दहशतीचे वातावरणात व संघ विसर्जित असतानाही नवीन नवीन तरुण प्रचारक म्हणून बाहेर पडत होते. तसे रायगड जिल्ह्यासाठी विनायक देशपांडे (आता विश्व हिंदू परिषदेचे अखिल भारतीय संघटन मंत्री आहेत.) यांची नियुक्ती झाली. आम्ही त्यांचे नाव सुभाष देसाई असे ठेवले होते व त्यांना एका डिटर्जंट पावडर कंपनीचा फिरता एजंट म्हणून ओळखपत्र मिळवून दिले होते.

चार-पाच महिन्यांचा कालावधी उलटल्यानंतर सुद्धा आणीबाणी उठण्याचे काही लक्षण दिसेना तेव्हा ऑक्टोबर नोव्हेंबर ७५ चे आसपास संपूर्ण देशभर सत्याग्रह करण्याचा निर्णय वरिष्ठ पातळीवर घेतला गेला. सत्याग्रही काढणे ही खूप अवघड गोष्ट होती. हा कालावधी कधी संपेल किंबहुना संपेल की नाही याची काहीच खात्री नव्हती. नोकरी व्यवसायांचे काय होईल सांगता येत नव्हते आणि त्यामुळे आपण जेलमध्ये गेलो तर कुटुंबाचे काय या भयाने हा वर्ग ८०-९० टक्के पुढे येणार नव्हता, त्यामुळे प्रामुख्याने विद्यार्थी वर्ग तसेच कौटुंबिक जबाबदारीतून मोकळे झालेले जेष्ठ अशांचाच विचार करावा लागत होता. विद्यार्थी वर्गाला सुद्धा घरांतून परवानगी मिळणे अवघड होते, त्यामुळे घरची परवानगी न घेता स्वतःचे हिमतीवर पुढे येणारे शोधावे लागत होते. स्वाभाविकपणे अभाविप तसेच संघाच्या बाल तरुण शाखा यांचेवर प्रमुख्याने भर राहिला.

रायगड जिल्ह्यात पनवेल अलिबाग रोहा माणगाव महाड इत्यादी तालुक्यातून सत्याग्रह झाले सर्व मिळून सुमारे वीस पंचवीस कार्यकर्त्यांनी सत्याग्रहात भाग घेतला होता सत्याग्रहात भाग घेतलेल्या सर्वांना अटक झाली त्यात प्रामुख्याने अलिबाग तालुक्यांतील बहुतेक सत्याग्रहींना मिसा लागला व बाकीच्यांना दोन महिन्यापासून चार सहा महिन्यापर्यंतच्या शिक्षा झाल्या. शिक्षा काळामध्ये सत्याग्रहींच्या घरी भेटावयास जाणे म्हणजे दिव्य असे. काय काय ऐकून घ्यावे लागले ते येथे लिहिणे शक्य नाही. मी स्वतः नोकरीला असल्यामुळे पत्ता बदलून ठाणे येथून सत्याग्रह केला होता व पंधरा दिवस ठाणे मध्यवर्ती कारागृहामध्ये होतो.

दिवस हळूहळू उलटत होते, अखेर मार्च १९७७ मध्ये आणीबाणी उठली, अर्थात नंतर संघ बंदीही उठली, मध्यवर्ती लोकसभेच्या निवडणुका घोषित झाल्या. निवडणुकांमध्ये संघाने सर्वत्र प्रचारामध्ये काँग्रेसच्या विरोधात जो कोणी उभा असेल त्या पक्षाचे साठी काम करण्याचा निर्णय झाला, रायगड जिल्ह्यामध्ये विरोधकां तर्फे शेतकरी कामगार पक्षाचे हे दि.बा. पाटील उभे होते, समन्वयासाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी संघाचा एक ज्येष्ठ कार्यकर्ता नियुक्त झाला होता, मी स्वतः एक महिना रजा घेऊन रोहा माणगाव या मतदारसंघाचा समन्वयक म्हणून काम केले. अखेरीस निवडणुकीमध्ये इंदिरा गांधींचा पराभव होऊन जनता पक्ष सत्तेवर आला, संघाचे कर्तृत्व उजळून निघाल्याने सर्वांना संघ प्रेमाचे भरते आले. आणीबाणीत नजरा चुकवणारे सुद्धा आमचा कसा संघाशी पहिल्यापासून संबंध होता ते उत्साहाने सांगू लागले. मला आठवते त्याप्रमाणे मी तेव्हा महाडला असताना ज्येष्ठ समाजवादी नेते श्री.कुमार सुप्तर्षी यांनी सुद्धा महाडला आले असताना संघ शाखेवर भेट दिली होती.

**-विनायक जोशी,**
**पेण, रायगड**

---

# पनवेल मनपा अग्निशमन यंत्रणा कात टाकतेय!

## चार अग्निबंबांसह ५५ मीटरची शिडी होणार ताफ्यात दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेच्या हद्दीतील अग्निशमन यंत्रणेची सुधारणा करण्यासाठी पालिका प्रशासनाने विविध पावले उचलली आहेत. सध्या महापालिकेकडे तीन अग्निशमन केंद्रे आहेत, परंतु वाढत्या लोकसंख्येच्या मागणीनुसार आणि नवीन गृहप्रकल्प उभारणीच्या पार्श्वभूमीवर खांदेश्वर स्थानकाजवळ नवीन अद्ययावत अग्निशमन केंद्र उभारण्याचे काम लवकरच सुरू होणार आहे. याशिवाय चार नवीन अग्निबंब आणि ५५ मीटर उंचीची शिडी लवकरच महापालिकेकडे दाखल होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.



पनवेल महापालिकेच्या स्थापनेपूर्वी येथे एकच अग्निशमन केंद्र होते. नंतर सिडको वसाहतींचे हस्तांतरण पालिकेकडे झाल्यानंतर नवीन पनवेल आणि कळंबोली येथील अग्निशमन केंद्रही पालिकेकडे आले. सद्यः स्थितीत पालिकेकडे तीन केंद्रे असून, १३५ कर्मचारी अग्निशमन यंत्रणेच्या कार्यासाठी तैनात आहेत. नवी मुंबई विमानतळाच्या कामांमुळे कामोठे, कळंबोली, तळोजा, रोहिंजन, घोटगाव, नावडे आणि खारघर परिसरात गृहप्रकल्पांची उभारणी सुरू आहे. यामुळे भविष्यात आग प्रतिबंधक यंत्रणांची कार्यक्षमता वाढविणे गरजेचे आहे.

खांदेश्वर स्थानकाजवळील नवीन केंद्र उभारून या भागातील नागरिकांना तत्काळ अग्निशमन सेवा उपलब्ध करून देण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट आहे. सिडकोने उभारलेली नवीन पनवेल आणि कळंबोली येथील अग्निशमन केंद्र सुमारे ४० वर्षे जुनी आहेत. या केंद्रांच्या इमारत जीर्ण झाल्याने नव्याने बांधकाम करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

> *भागांत नवीन गृहप्रकल्प उभारले जात असून, लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात भर पडली आहे. पालिका आयुक्त मंगेश चितळे आणि उपायुक्त कैलास गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली कामोठ्यात लवकरच नवीन अद्ययावत अग्निशमन केंद्र उभारले जाणार आहे. तसेच तळोजा घोट परिसरात अग्निशमन केंद्र उभारण्याचा पालिकेचा मनोदय आहे.*
>
> ***-प्रवीण बोडके,***
> *मुख्य अग्निशमन अधिकारी, पनवेल महानगरपालिका*

---

# खारघरच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा 'एज्युकेशन टुडे'कडून गौरव



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा लागला आहे. Education Today या नामांकित शैक्षणिक संस्थेकडून Certificate of Achievementने गौरविण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यातील Top State Board school या मानांकनात "Student Advancement & Mentoring" या श्रेणीत शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा मान मिळाल्याने संस्थेच्या प्रगतीत नवा टप्पा गाठला असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी सातत्याने होत असलेल्या प्रयत्नांची पावती म्हणून या सन्मानाकडे पाहिले जात आहे. शिक्षकांच्या मेहनतीमुळे व शैक्षणिक मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होत असून या कार्याची दखल घेत Education Todayने हा बहुमान बहाल केला आहे.

या यशाबद्दल संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख यांनी प्राचार्य निशा नायर आणि सर्व शिक्षकवृदांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ.एस.टी.गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी आदींनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

---

# सेवा पंधरवड्यानिमित्त शिरवणेत जिल्हा कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त साजरा होणाऱ्या सेवा पंधरवड्याच्या अंतर्गत प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सेवा पंधरवडा प्रदेश कार्यशाळेत दिलेल्या सूचनानुसार तसेच वनमंत्री गणेश नाईक आणि आमदार मंदा म्हात्रे यांच्या मार्गदर्शनानुसार आणि नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या माध्यमातून शिरवणे विद्यालय व जुनिअर कॉलेज, नेरूळ येथे ९ सप्टेंबर रोजी जिल्हा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी सेवा पंधरवडा १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान राबवण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती भाजपा नवी मुंबई जिल्हा कार्यकारिणी व पदाधिकाऱ्यांना देण्यात आली. याप्रसंगी ठाणे कोकण विभाग संवादक अभिजित पेडणेकर यांनी सेवा पंधरवडा नियोजनाची माहिती घेतली. या वेळी डॉ. राजेश पाटील निलेश म्हात्रे, दत्ता घंगाळे, माजी नगरसेवक प्रभाकर भोईर, राजू शिंदे, डॉ. जयाजी नाथ, माजी नगरसेविका भारतीताई पाटील, सायली शिंदे, अंजली वाळुंज, मीरा पाटील, कृष्णा पाटील, नवी मुंबईचे भाजपा मंडळ अध्यक्ष व ज्येष्ठ पदाधिकारी, युवा व महिला मोर्चा पदाधिकारी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदींचा १७ सप्टेंबर रोजी वाढदिवस असून त्या अनुषंगाने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान विविध कार्यक्रम नेमून दिलेले आहेत. त्या संदर्भातली माहिती नवी मुंबई जिल्ह्याच्या कार्यकारिणी व आजी माजी पदाधिकारी यांची बैठक वजा कार्यशाळा घेण्यात आली. सदर पंधरवड्यात रक्तदान, आरोग्य शिबिर, दिव्यांगाचा सन्मान, त्यांना उपकरणांचे वाटप, विचारवंत संवाद कार्यक्रम, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता अभियान, वृक्षारोपण असे अनेक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. ही सर्व माहिती डॉ. राजेश पाटील यांनी पदाधिकाऱ्यांना दिली. वनमंत्री नामदार गणेश नाईक आणि आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त हे सगळे कार्यक्रम यशस्वीरित्या राबवण्याचा प्रयत्न करू, असे डॉ. राजेश पाटील यांनी या वेळी सांगितले.

---



# राष्ट्रीय बंजारा परिषदेकडून निवेदन

**कळंबोली : बातमीदार**

हैदराबाद गॅझेटप्रमाणे बंजारा समाजाला (ST) अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करून शैक्षणिक, आर्थिक, व राजकीय लाभ मिळावा यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदार पनवेल यांच्यामार्फत राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले.

बोर बंजारा समाजाची पारंपारिक तांडा संस्कृती, व शैक्षणिक वंचितता, देशभरातील सांस्कृतिक एकसंघता आणि ऐतिहासिक दस्तऐवजाचा आधार घेतला असता आम्हाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देणे हे घटनात्मक कर्तत्वाची बाब आहे. समानतेचा न्याय आणि समानतेचा अधिकार व सामाजिक न्यायाचा घटनात्मक तत्त्वाचा विचार करून तातडीने निर्णय, अशी विनंती या निवेदनामध्ये करण्यात आलेली आहे. निवेदन देण्यासाठी पनवेल महापालिका क्षेत्रातील बंजारा समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# नाट्यगृहाची वास्तू रोह्याच्या वैभवात भर घालणारी -उपमुख्यमंत्री अजित पवार

**रोहा, धाटाव : प्रतिनिधी**

डॉ सी.डी.देशमुख नाट्यगृहाचे भूमिपूजन माझ्या हस्ते झाले. तीन वर्षात रोहा शहराच्या वैभवात भर घालणारी अतिशय सुंदर अशा प्रकारची वास्तू उभी राहिली आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. ते रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने बांधण्यात आलेल्या डॉ.सी.डी. देशमुख शहर सभागृहाच्या उद्‍घाटन समारंभात बोलत होते.


छाया : जुगल दवे, रोहा.

समारंभास खासदार सुनील तटकरे, महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, अभिनेते सयाजी शिंदे, भरत जाधव, माजी आमदार अनिकेत तटकरे, राष्ट्रवादीचे नेते मुस्ताक अंतुले, जिल्हाधिकारी किसन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजय मोरे, जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, महिला अध्यक्ष उमा मुंडे, युवक अध्यक्ष अंकित साखरे, विनोद पाशिलकर, शिवराम शिंदे, रामचंद्र सकपाळ, संतोष पोटफोडे, समीर शेडगे, अमित उकडे, मुख्याधिकारी अजयकुमार एडके आदी उपस्थित होते.

या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी, आज नाट्यगृहाचे नवीन देखणेपण रोहेकर अनुभवत आहेत. अद्ययावत नाट्यगृह समर्पित करताना आनंद वाटत आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून अजितदादा तुमचे आभार! ज्याचे दादांनी भूमिपूजन केले आणि लोकार्पणही त्यांनी केले, असे सांगितले. शहर सभागृहात ज्यांचे ज्यांचे फोटो होते सर्वांचे फोटो लावण्यात येतील. डॉ सी.डी. देशमुख यांचा ऐतिहासिक ठेवा येथे जतन करण्यात येईल, असेही खासदात तटकरे म्हणाले.

अभिनेता सयाजी शिंदे यांनी, मी रोह्यात दुसऱ्यांदा आलो आहे. महाराष्ट्रातील नाट्यगृह चांगले व्हावे अशी मागणी त्यांनी अजितदादांकडे करीत अतिशय सुंदर असे नाट्यगृह रोह्यात झाले असल्याचे सांगितले.

अभिनेता भरत जाधव यांनी, मी रोह्यात या आधी नाटक केले आहे. आज या नाट्यगृहाचा कायापालट झाले आहे. चांगले नाट्यगृह झाल्याने खासदार सुनील तटकरे यांचे कौतुक आहे. मराठी नाटके चालतात, महाराष्ट्रात प्रेक्षक आहेत, पण चांगली नाट्यगृह नाहीत. चांगल्या नाट्यगृहासाठी अजितदादांनी लक्ष घालावे, अशी मागणी केली.

प्रास्ताविकात मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, या ऐतिहासिक वास्तूचे उद्‍घाटन होत असताना आपण या क्षणाचा साक्षीदार होऊ शकलो याचा एक विशेष अभिमान व आनंद आहे. एक बायोडायव्हर्सिटी पार्कसुद्धा रोहा तालुक्यामध्ये तयार करतोय.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संजय भुस्कुटे यांनी व्यक्त केले.

# कोर्लई समुद्र किनारी धूप

## डांबरी रस्ता गेला वाहून



**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील कोर्लई येथे समुद्र किनारी मोठ्या प्रमाणात धूप झाली आहे. त्यामुळे तेथील किनाऱ्याजवळ असलेला डांबरी रस्ता वाहून गेल्याचे निदर्शनास येते.

कोर्लई गावाला अंदाजे दोन किमीचा समुद्र किनारा लाभला आहे. या किनारी काही वर्षांपूर्वी अर्ध्या भागात नव्याने दगडी बंधारा बांधण्यात आला, परंतु उर्वरित भागात बंधारा नसल्याने समुद्राच्या उधाणाने लगत मोठ्या प्रमाणावर धूप होत आहे. त्यामुळे तेथील कोर्लई ते बोर्लीकडे जाणारा डांबरी रस्तासुद्धा अर्धा वाहून गेल्याचे दिसते.

कोर्लई समुद्र किनाऱ्यालगत होत असलेली धूप चिंतेची बाब असून समुद्राचे पाणी वेस ओलांडून पुढे पुढे येत आहे. या बाबीकडे संबंधितांनी दुर्लक्ष केल्यास या किनाऱ्यालगत मोठी धूप झालेली पहावयास मिळेल, शिवाय उर्वरित डांबरी रस्तासुद्धा यामध्ये वाहून जाण्याची शक्यता आहे. नित्याने गरजेचा व रहदारीचा असलेला रस्ता वाहून गेल्यास तेथून जाणे-येणे जिकीरीचे होईल. संबंधितांनी कोर्लई समुद्र किनारी लवकरात लवकर धूप प्रतिबंधक बंधारा बांधावा, अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत.

दरम्यान, कोर्लई समुद्र किनारी बेकायदेशीररित्या वाळू उत्खन्नन केले जात आहे व त्यामुळेच तेथे मोठ्या प्रमाणात धूप होत असल्याचे येथील ग्रामस्थांनी सांगितले.

# शिवसेना कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षप्रवेश केला.



या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, उत्तर रायगड जिल्हा कार्याध्यक्ष अशोक भोपतराव, उपाध्यक्ष एकनाथ धुळे, मुख्य प्रवक्ते भरत भगत, कर्जत तालुकाध्यक्ष दीपक श्रीखंडे, युवक जिल्हाध्यक्ष अंकित साखरे आदी उपस्थित होते.

या वेळी कर्जत तालुक्यातील खांडपे ग्रामपंचायतीचे माजी सदस्य अविनाश शिर्के, माणगाव शाखाप्रमुख दीपक घारे, माजी उपसरपंच अनिल पाटील यांच्यासह इतरांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला, तर खालापूर तालुक्यातील जांबरुंग ग्रामपंचायत अंतर्गत ठाकूरवाडी येथील गणपत मेंगाळ, नामदेव कातवारा, गोविंद मेंगाळ आदी कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. राष्ट्रवादीचे नेते सुधाकर घारे यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले.

# माणगावमध्ये मंगळवारी मोफत नेत्र तपासणी शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

उम्मत-ए मुस्लिम कमिटी माणगाव व लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने १६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत माणगाव येथील शासकीय विश्रामगृह या ठिकाणी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचा जन्म दिवस म्हणून ईद-ए-मिलाद साजरी केली जाते. या ईदनिमित्त सर्वधर्मसमभाव मानून हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या शिबिरात मोतीबिंदूची तपासणी करून मोफत शस्त्रक्रिया, नेत्र तपासणी व सवलतीच्या दरात चष्मे वाटप, डोळ्यांचे इतर आजार तपासणी करून कमी खर्चामध्ये शस्त्रक्रिया केली जाईल. शिबिरात येताना नेत्र रुग्णांनी आधारकार्ड घेऊन येणे बंधनकारक आहे.

# खासदार सुनील तटकरेंचा २१ सप्टेंबरला कर्जतमध्ये सत्कार

**खोपोली : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांना नुकतेच लंडन येथे आयोजित लोकमत मरोसाल इकॉनॉमिक कन्व्हेन्शनमध्ये भारत भूषण हा जागतिक सन्मान प्रदान करण्यात आला. यानिमित्ताने रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे त्यांचा व वरदा तटकरे यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा कर्जत येथे आयोजित करण्यात आला आहे.

हा सत्कार रविवारी (दि. २१) सायंकाळी ४ वाजता कर्जत येथील पोलीस मैदानावर होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष व राज्यसभा खासदार प्रफुल्ल पटेल भूषविणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, माजी मंत्री व आमदार धनंजय मुंडे, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष रूपालीताई चाकणकर, पक्षाचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे, मावळचे आमदार सुनील शेळके, माजी आमदार अनिकेत तटकरे उपस्थित राहणार आहेत.

या भव्य सोहळ्याचे निमंत्रक म्हणून सुधाकर घारे, अशोक भोपतराय, सुभाष केकाणे, भरत भगत, उमा मुंडे, अंकित साखरे, नाझीम हसवारे, ॲड. उत्तम जाधव, गवयन मनये आदींचा समावेश आहे, तर कार्यक्रमाचे संयोजक म्हणून कर्जत तालुका अध्यक्ष दीपक श्रीखंडे व खालापूर तालुका अध्यक्ष संतोष बैलमारे जबाबदारी सांभाळत आहेत.

# रायगड जिल्ह्यात सेवा पंधरवडा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी महसूल प्रशासन अधिक गतिमान, लोकाभिमुख व कार्यक्षम होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगामी जन्मदिनी १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे.

सेवा पंधरवड्याच्या पहिल्या टप्प्यात १७ ते २२ सप्टेंबर या कालावधीत पाणंद रस्ते मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत अतिक्रमित शिव व पाणंद रस्त्याचे सीमांकन व मोजणी करणे, शेतावर जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देणे, अतिक्रमित रस्ता असल्यास अतिक्रमणे दूर करणे, रस्त्याच्या नोंदी महसूल अभिलेखात घेणे इत्यादी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सद्य:स्थितीत गाव नकाशावर असलेले रस्ते व वहिवाटीचे रस्ते ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, व स्थानिक पदाधिकारी यांच्यामार्फत शिवार फेरीव्दारे रस्त्याची पाहणी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. या निमित्ताने सर्व शेतकरी बांधवांनी शेतावर पाहाणी करतेवेळी ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्यासोबत सहभाग नोंदवावा. तसेच शेतरस्त्याच्या वादाबाबत काही समस्या असल्यास १९ सप्टेंबर रोजी आयोजित केलेल्या रस्ता अदालतीमध्ये सहभाग घ्यावा.

महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली शेत रस्त्यासंदर्भात अत्यंत महत्त्वाकांक्षी असे अभियान १७ ते २२ सप्टेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. शेतरस्ता हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने शेती विकासाच्या बाबतीत अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने या अभियानात सर्व शेतकरी बांधवांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन तालुका प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# माणगाव ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेची वार्षिक सभा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल या पतसंस्थेच्या भागधारकांची (सभासदांची) सत्ताविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्था कार्यालयात शुक्रवारी (दि.१२) चेअरमन आनंद यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.



सभेच्या सुरुवातीस उपस्थित सर्व संचालक मंडळ, भागधारक, मान्यवर यांचे चेअरमन व सहकारी संचालकांनी स्वागत करून अहवाल सालात ज्ञात व अज्ञात सभासद, त्यांच्या संबंधितांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर संस्थेचे व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले ते इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

सभेत बोलताना संस्थेचे चेअरमन आनंद यादव यांनी सांगितले की, आपल्या पतसंस्थेची स्थापना १७ डिसेंबर १९९८ रोजी करण्यात आली असून प्रत्यक्षात संस्थेचे कामकाज १९९९पासून सुरू झाले. संस्थेची आपली सभासद संख्या १७५२ इतकी आणि वसूल भागभांडवल एक कोटी ६७ लाख ९८ हजार रुपये इतकी आहे. संस्थेत २३ कोटी ४१ लाख ३१ रुपयांच्या ठेवी असून ९५०८ इतकी ठेवीदार संख्या आहे. संस्थेतर्फे आतापर्यंत १८ कोटी ३८ लाख रुपये इतके कर्ज वाटप करण्यात आले व कर्जदारांची संख्या ४२० इतकी आहे. संस्थेची थकबाकी नेट एनपीए ०.६५%असून गुंतवणूक आठ कोटी ९३ लाख ३६ हजार रुपये, तर निव्वळ नफा ४६ लाख १९ हजार रुपये इतका आहे.

सर्वसामान्यांच्या हितासाठी ही पतसंस्था आपण सुरू केली आहे. सर्वांच्या सहकार्याने दरवर्षी पतसंस्थेची भरभराट होत असून मे महिन्यात आपण संस्थेची इंदापूर शाखा सुरू केली. या शाखेची दिवसेंदिवस प्रगती होत असून लवकरच मोर्बा शाखा सुरू करणार आहोत, असे सांगून विविध सामाजिक उपक्रम राबविणारी आपली ही एकमेव पतसंस्था आहे, असेही यादव यांनी म्हटले.

या सभेला संस्थेचे संचालक दिलीप जाधव, नरेश राजपूत, उदय म्हशेलकर, संदीप खरंगटे, अरुण प्रभाळे, सभासद अलीभाई यतिनमनी, जयंत बोडेरे, तुकाराम काळे, सुरेश गायकवाड, अरुण सिंग आदींसह भागधारक (सभासद), कर्मचारीवृंद, स्वल्पबचत प्रतिनिधी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्येष्ठ संचालक दिलीप जाधव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# रायगडातील महिलांची गणेशमूर्ती विक्रीत गरूडझेप

## बचत गटांना रोजगार

***महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत पेण व जिल्ह्यातील इतर तालुक्यातील विविध बचत गटातील महिला या गणपती व्यवसायात सहभागी झाल्या आहेत. महिला बचत गटांनी एक लाख ६६ हजार ८३३ गणपती मूर्ती तयार केल्या असून यामधील एक हजार ५०० गणपती मूर्ती परदेशात पाठविण्यात आल्या आहेत. गणपती मूर्ती व्यवसायातून १३ कोटी १३ लाख ८७ हजार २०० रुपयांची उलाढाल केली आहे. व्यवसायासाठी उमेद अभियानमार्फत महिला बचत गटांना फिरता निधी तसेच ग्राम संघांना समुदाय गुंतवणूक निधी आणि बँकांमार्फत पतपुरवठा करण्यात आला असून महिलांच्या या व्यवसायाला गती प्राप्त झाली आहे. या व्यवसायामुळे महिलांच्या हाताला काम मिळाल्यामुळे त्या अधिक सक्षम बनल्या आहेत.***

**रायगड : रामप्रहर वृत्त**

उमेद अभियानांतर्गत गणपती मूर्ती व्यवसायात महिलांनी पाऊल ठेवले आहे. या व्यवसायातून महिलांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे. बचत गटातील महिलांनी एक लाख ६६ हजार ८३३ गणेशमूर्ती व्यवसायातून १३ कोटी १३ लाख ८७ हजार २०० रुपयांची उलाढाल करण्यात आली आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी बचत गटातील महिलांना व्यवसायाच्या दृष्टीने मार्गदर्शन केल्याने जिल्ह्यातील महिलाशक्ती गणपती मूर्ती व्यवसायात गरुडझेप घेऊ शकल्या आहेत.



रायगड जिल्ह्यातील पेण तालुका गणपतीमूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पेणमध्ये तयार केलेल्या गणपती मूर्तींना देश-विदेशात मोठी मागणी आहे. सुबक आखणी, नेटकी बैठक, सुंदर कोरीवकाम, रेखीव डोळ्यांची रचना आणि रंगकाम यामुळे पेणच्या गणपतीमूर्तींना स्वतःची खास ओळख प्राप्त झाली असून या मूर्तींना भौगोलिक मानांकन मिळाले आहे. या व्यवसायात पेण तालुक्यातील महिला बचत गट उतरले आहेत.

अलिबाग तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या एक हजार २७७ असून उलाढाल आठ लाख १५ हजार, कर्जत तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या तीन हजार ४५० व उलाढाल ३० लाख ५० हजार, खालापूर तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या १५० व उलाढाल दोन लाख ३० हजार, महाड तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या ३२० व उलाढाल दोन लाख ५० हजार, माणगाव तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या ४२० व उलाढाल तीन लाख ४५ हजार, म्हसळा तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या ३५८ व उलाढाल दोन लाख ९६ हजार ५००, मुरुड तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या ६५० व उलाढाल १६ लाख २५ हजार, पनवेल तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या २२० व उलाढाल सहा लाख ४५ हजार, पेण तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या एक लाख ५८ हजार १०२ असून उलाढाल १२ कोटी २१ लाख ९५ हजार ७००, पोलादपूर तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या १३५ व उलाढाल १ लाख ६५ हजार, रोहा तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या ९८ व उलाढाल ६० हजार, श्रीवर्धन तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या ४५० व उलाढाल सहा लाख ६५ हजार, सुधागड तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या १०० व उलाढाल ७० हजार, तळा तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या १३८ व एकूण उलाढाल दोन लाख ६० हजार, उरण तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या ९६५ व उलाढाल सात लाख १५ हजार आहे. अशा एकूण एक लाख ६६ हजार ८३३ विक्री केलेल्या मूर्तींची संख्या असून एकूण उलाढाल १३ कोटी १३ लाख ८७ हजार २०० रुपयांची करण्यात आली आहे.

जास्तीत जास्त महिलांनी या व्यवसायात सहभागी होऊन या माध्यमातून उपजीविकेच्या नवनवीन संधी निर्माण होऊन महिला सक्षमीकरणाकडे वाटचाल करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी केले आहे.

# रोह्यात गुजराती समाजातर्फे भागवत सप्ताह उत्साहात

**रोहा : प्रतिनिधी**

रोह्यात गुजराती समाजाच्या वतीने भक्तिमय वातावरणात भागवत साप्ताह ८ ते १२ सप्टेंबरपर्यंत सत्यनारायण मंदिरामध्ये आयोजित करण्यात आला होता.

रोह्यातील गुजराती समाज महिला मंडळच्या पुढाकाराने पाच दिवस आध्यात्मिक वातावरणात भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. यात मोठ्या संख्येने समाज बांधवांनी सहभाग घेतला.

भगवत सप्ताह यशस्वी करण्यासाठी महिला अध्यक्ष दक्षा शहा, गुजराथी समाज अध्यक्ष भावेश दामाणी, नगर परिषदेचे माजी गटनेते महेंद्र गुजर, उद्योजक जगदिश दामाणी यांच्यासह गुजराती समाज बांधव-भगिनींनी परिश्रम घेतले.



# फिल सॉल्टचे वादळी शतक
## टी-२०मध्ये इंग्लंडच्या विक्रमी तीनशेपार धावा



**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

मँचेस्टर येथील ओल्ड ट्रॅफर्डच्या मैदानात रंगलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात इंग्लंडचा सलामीवीर फिल सॉल्टने विक्रमी शतक झळकावले. संघाच्या डावाची सुरुवात करताना वादळी खेळीचा नजराणा पेश करताना त्याने ३९ चेंडूत शतक साजरे केले. आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात इंग्लंडकडून सर्वात जलद शतक झळकवण्याचा विक्रम आता त्याच्या नावे झाला आहे.

सॉल्टच्या वादळी खेळी आधी इंग्लंडच्या ताफ्यातून आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये सर्वात जलद शतक झळकवण्याचा विक्रम हा लायम लिविंगस्टोनच्या नावे होते. त्याने २०२१मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या टी-२० सामन्यात ४२ चेंडूत शतक झळकावले होते. आपल्या सहकाऱ्याला मागे टाकत सॉल्ट टी-२०मध्ये इंग्लंडचा फास्टेस्ट सेंच्युरीयन ठरला आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात सॉल्टने ६० चेंडूत नाबाद १४१ धावांची खेळी साकारली. या खेळीत त्याच्या भात्यातून १५ चौकार आणि आठ षटकार पहायला मिळाले. त्याच्या या खेळीशिवाय जोस बटलरने आठ चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने ३० चेंडूत ८३ धावा कुटल्या. जेकब बेथेल १४ चेंडूत २६ धावा करून परतल्यावर कर्णधार हॅरी ब्रूकने २१ चेंडूत ४१ धावांची नाबाद खेळी करत सॉल्टच्या साथीने संघाच्या धावफलकावर निर्धारित २० षटकात २ बाद ३०४ धावा लावल्या. प्रत्युत्तरात द. आफ्रिकेचा डाव १६.१ षटकांत १५८ धावांवर संपुष्टात आला.

आयसीसीचे पूर्ण सदस्य असलेल्या संघाविरुद्ध आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये उभारलेली ही सर्वोच्च धावसंख्या ठरली. याआधी हा विक्रम टीम इंडियाच्या नावे होता. भारतीय संघाने २०२४मध्ये हैदराबादच्या मैदानात बांगलादेशविरुद्धच्या टी-२०सामन्यात ६ बाद २९७ धावा केल्या होत्या. हा विक्रम इंग्लंडच्या संघाने मोडीत काढला आहे.

# 'सीकेटी'ची प्रारंभी पवार जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत अव्वल




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील विद्यार्थिनी प्रारंभी ऋषिकांत पवार हिने प्रथम क्रमांक पटकावला.

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल येथे जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा तालुका क्रीडा संकुलात महापालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. या स्पर्धेत सीकेटी महाविद्यालातील इयत्ता दहावीची विद्यार्थिनी प्रारंभी पवार हिने १७ वर्षाखालील मुलींच्या गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला. स्पर्धेच्या पुढील स्तरासाठी तिची निवड करण्यात आली आहे.

संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रारंभीचे अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# पावसाळी क्रीडा स्पर्धेत सर एसए हायस्कूलचे यश

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धा अंतर्गत विहूर येथील मेहबूब एज्युकेशन ट्रस्ट येथील हायस्कूलमध्ये कबड्डीचे सामने, तर मुरूडमधील सर एस.ए. हायस्कूलमध्ये खो-खोचे सामने रंगले. यामध्ये सर एस.ए. हायस्कूलच्या मुला-मुलींच्या संघाने सुयश प्राप्त केले.

कबड्डी स्पर्धेत १९ वर्ष वयोगटामध्ये सर एस.ए. हायस्कूलच्या मुलींनी प्रथम क्रमांक मिळवला, तर १७ वर्षवयोगटातील व १९ वर्ष वयोगटाच्या मुलांनी दमदार खेळी करत उपांत्य फेरी गाठली. याशिवाय खो-खोमध्ये अचूक रणनीती व कौशल्यपूर्ण खेळाच्या जोरावर १४, १७, १९ वर्ष अशा तिन्ही वयोगटात प्रथम क्रमांक मिळवला आहे.

या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक सरोज राणे, जंजिरा विद्या मंडळाचे अध्यक्ष सुधाकर दांडेकर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यासाठी शाळेतील क्रीडा शिक्षक बालाजी घुगे, महेंद्र घाटवळ, आनंद तोंडले-पाटील यांनी अथक परिश्रम घेतले.

# हरभजन सिंग होणार बीसीसीआयचा अध्यक्ष?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

येत्या २८ सप्टेंबरला भारतीय क्रिकेट नियामक मंडळ बीसीसीआयची वार्षिक बैठक होणार आहे.



या बैठकीत भारताचा माजी फिरकी गोलंदाज हरभजन सिंग पंजाब क्रिकेट असोसिएशनचा प्रतिनिधी म्हणून हजेरी लावणार असल्याचे म्हटले जात आहे. ही बैठक अतिशय महत्त्वाची असून बैठकीत पाच अधिकाऱ्यांची निवड नियुक्ती केली जाणार आहे.

वृत्तानुसार बीसीसीआयच्या वार्षिक बैठकीत केवळ हरभजन सिंग नसेल, तर भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुलीदेखील उपस्थित राहणार असल्याची माहिती मिळत आहे. या बैठकीत आयपीएल गव्हर्निंग काउन्सिल आणि बोर्डच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यासाठी निवडणूकदेखील होणार आहे. बीसीसीआयची पदे भरून काढण्यासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे, ज्यात सचिव, अध्यक्ष, उपाध्यक्ष, संयुक्त सचिव आणि खजिनदार या पदांचा समावेश आहे.



# सागरी सुरक्षा चषक कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन


**रेवदंडा : प्रतिनिधी**

सागरी सुरक्षेच्या दृष्टीने रायगड जिल्हा पोलीस अंतर्गत सागरी सुरक्षा चषक २०२५ साखळी कबड्डी स्पर्धेचे आयोजन रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली मांडवा, अलिबाग, रेवदंडा, मुरूड व श्रीवर्धन या समुद्र किनारी करण्यात आले आहे. यातील रेवदंडा येथील स्पर्धेचे उद्घाटन अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे यांच्या हस्ते शनिवारी (दि. १३) झाले.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक श्रीकांत किरविले, प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. आशिष धरणकर, सरपंच प्रफुल्ल मोरे, ग्रामपंचायत सदस्य सुराराम माळी, शिवसेना महिला अध्यक्ष शलाका राऊत, सागरी सुरक्षा प्रमुख सुहास घोणे, खाद्यसम्राट नलिनी मुंबईकर तसेच रेवदंडा पोलीस ठाणे कर्मचारी व सागरी सुरक्षा दल सदस्य उपस्थित होते.

या स्पर्धेत रेवदंडा, नागोठणे, अलिबाग व पोयनाड या संघाचे साखळीतील सामने रंगले. पंच म्हणून सहाय्यक फौजदार नितीन समजीसकर, नंदकुमार पाटील, संजय मोकल, हवालदार विश्वनाथ म्हात्रे, अमोल नलावडे, स्वागत ठाकूर, नाईक प्रणित पाटील, शिपाई सुरज म्हात्रे, सर्वेश थळे, ज्ञानेश्वर पालवे यांनी काम पाहिले, तर रायगड जिल्हा स्पोर्ट्स इन्चार्ज ऋषिकेश साखरकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे, मारूती पाटील, चंद्रकांत बोरकर यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन विश्वनाथ पाटील यांनी केले.

# भारत-पाक सामन्यापूर्वी शाहीद आफ्रिदी बरळला
## इरफान पठाणला केले लक्ष्य



**कराची : वृत्तसंस्था**

पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू शाहीद आफ्रिदीने त्यांच्या टीव्ही चॅनेलवरील आशिया कप शोदरम्यान वादग्रस्त विधान केले आहे. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या व्हिडीओमध्ये आफ्रिदी असे म्हणताना ऐकू येतो की, भारताच्या मुस्लिम खेळाडूंना त्यांची घरे जाळून टाकण्याची धमकी दिली जाते. तेथे असेही काही क्रिकेटपटू आहेत, जे अजूनही सिद्ध करण्याचा प्रयत्न करत आहेत की ते भारतीयच आहेत. आणि आता तर तेच लोक आशिया कपमध्ये जाऊ कॉमेंट्रीही करत आहेत.

शाहिद आफ्रिदीने या टीव्ही शोमध्ये बोलताना भारतीय दिग्गज इरफान पठाणला नाव न घेता लक्ष्य केले आहे. व्हायरल क्लिपमध्ये त्याने ज्या खेळाडूबद्दल भाष्य केले आहे, तो इरफान पठाण आहे, कारण इरफान पठाणचा हा सोनी नेटवर्कच्या समालोचन पॅनेलमध्ये समावेश आहे. तथापि, शाहिद आफ्रिदीच्या या वादग्रस्त व्हिडओवर इरफान पठाणकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही, पण भारतीय क्रिकेट चाहत्यांनी आफ्रिदीवर टीका करण्यास सुरुवात केली आहे.

अलीकडेच, इंडिया चॅम्पियनच्या खेळाडूंनी वर्ल्डकप स्पर्धेत पाकिस्तानसोबतच्या सामन्यावर बहिष्कार टाकला. इंडिया चॅम्पियनमधील इरफान पठाण, शिखर धवन, हरभजन सिंग आणि युवराज सिंगसारख्या खेळाडूंनी पाकिस्तानविरुद्ध सामना खेळण्यास नकार दिला होता. भारतीय खेळाडूंच्या या निर्णयामुळे जागतिक स्तरावर पाकिस्तानचा अपमान झाला आणि भारतीय चाहत्यांनी या गोष्टीचे कौतुक केले होते. त्यामुळे आफ्रिदी अजूनही संतापलेला दिसतो.

# सरकार आपले काम करेल, खेळाडूंनी त्यांचे काम करावे!
## भारत-पाक सामन्यावर कपिल देव यांचे मत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ रविवारी (दि.१४) आमनेसामने येणार आहेत. अशात काही क्रिकेट चाहत्यांनी हा सामना रद्द करण्याची मागणी केली आहे. याबाबतीत भारताच्या वर्ल्डकप विजेत्या संघाचे कर्णधार कपिल देव यांचे मत वेगळे आहे. त्यांनी भारतीय खेळाडूंना सामना खेळण्यावर लक्ष देण्याचा सल्ला दिला आहे.



आशिया चषक २०२५ स्पर्धेचे यजमानपद भारताकडे आहे. या स्पर्धेचे आयोजन दुबईत करण्यात आले आहे. भारत-पाकिस्तान यांच्यातील तणावाची स्थिती पाहता दोन्ही संघ एकमेकांविरुद्ध खेळणे टाळताना दिसत आहे. कपिल देव यांनी क्रिकेट चाहत्यांना विनंती केली आहे की, हा सामना होऊ द्या, कारण दोन्ही संघांनी एकमेकांविरुद्ध खेळायचे की नाही हा बीसीसीआय किंवा पीसीबीचा निर्णय नाही, तर हा निर्णय दोन्ही देशातील सरकारकडून घेण्यात आला आहे. पहिला सामना भारताने सहज जिंकला. मला विश्वास आहे ते ट्रॉफी जिंकून येतील. सरकार आपले काम करेल, खेळाडूंनी त्यांचे काम करावे.

# फुटबॉल वर्ल्डकपसाठी तिकीट विक्रीला प्रचंड प्रतिसाद

**नवी दिल्ली** : फिफाच्या २०२६मध्ये होणाऱ्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या तिकीट विक्रीला जगभरातून प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. तिकीट विक्री सुरू झाल्यानंतर पहिल्या चोवीस तासात २१० देशांमधील तब्बल १५ लाखांहून अधिक तिकिटांसाठी अर्ज आले.

सर्वाधिक अर्ज अमेरिका, मेक्सिको व कॅनडा या यजमान देशांमधून आले आहेत. त्यानंतर अर्जेंटिना, कोलंबिया, ब्राझील, इंग्लंड, स्पेन, पोर्तुगाल, जर्मनीमधूनही मोठ्या प्रमाणात अर्ज आले. तिकिटांची सुरुवातीची किंमत ६० डॉलर (जवळपास ५,००० रुपये) आहे. मागणीनुसार दरांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

# सचिन तेंडुलकरच्या विमानाची केनियामध्ये जंगल भागात इमर्जन्सी लँडिंग

**नैरोबी : वृत्तसंस्था**

मास्ट रब्लास्टर सचिन तेंडुलकर प्रवास करत असलेल्या एका छोटेखानी विमानाची केनियाचा जंगलातील एका सपाट जागेवर (मातीच्या रस्त्याचा छोटा विमानतळ) आपत्कालीन लँडिंग करण्यात आली. केनियाच्या मासाई मारा जंगलात ही जागा आहे. एका मोठ्या वादळामुळे त्याचे विमान पुढे जाऊ शकत नव्हते. यामुळे या विमानाला घनदाट जंगलातील या जागेवर उतरावे लागले होते.

सचिन तेंडुलकरने त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. यात तो ते छोटेखानी विमान दाखवत आहे. मातीच्या रस्त्यावर हे विमान उतरविण्यात आले होते. वादळी वारा आणि पाऊस असल्याने हे विमान पुढे उड्डाण करू शकत नाही. यामुळे त्याला नेण्यासाठी जीप येत असल्याचे तो म्हणाला आहे, परंतु जर जीप नाही आल्या, तर रात्री या जंगलात थांबावे लागणार असल्याचे त्याने सांगितले तसेच हाही एक अनुभव एन्जॉय करण्याचा आहे, असे तो म्हणाला.

मसाई मारावरून उड्डाण करत असताना दुरून एक भयानक वादळ दिसले. खराब हवामानामुळे पायलटला दोनदा लँडिंग रद्द करावे लागले, ज्यामुळे विमानात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. रनवे मोकळा झाल्यानंतर विमान दुसऱ्या बाजूला लँड करण्यात आल्याचे सचिनने म्हटले आहे.

# शुबमन गिलच्या हातातल्या घड्याळ्याची रंगली चर्चा




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघ सध्या दुबई येथे सुरू असलेल्या आशिया कपमध्ये खेळत आहे. पहिला सामना भारताने सहज जिंकला. आता यूएईविरुद्ध शानदार विजयानंतर भारताचा दुसरा सामना रविवारी (दि. १४) पाकिस्तानशी होणार आहे. या मोठ्या सामन्यापूर्वी टीम इंडियाचे खेळाडू आनंदी मूडमध्ये दिसत आहेत. यादरम्यान टीमचा उपकर्णधार शुभमन गिल त्याच्या सोशल मीडिया पोस्टमुळे चर्चेत आला आहे.

शुभमन गिलने नुकताच त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये तो कॅज्युअल लूकमध्ये दिसत आहे, मात्र या फोटोमध्ये सर्वांचे लक्ष त्याच्या मनगटावर बांधलेल्या महागड्या घड्याळाकडे वेधले गेले आहे. शुभमनने रोलेक्स ऑयस्टर यलो गोल्ड आणि डायमंड घड्याळ घातले आहे. या घड्याळाच्या किमतीने सर्वांना आश्चर्यचकित केले आहे, कारण या घड्याळाची किंमत सुमारे ९० लाख ते एक कोटी रुपयांच्या दरम्यान असल्याचे सांगितले जात आहे.

क्रिकेट जगतात खेळाडूंना महागड्या वस्तूंची आवड असणे हे काही नवीन नाही. टीम इंडियाचे अनेक खेळाडू अनेकदा महागड्या घड्याळे आणि लक्झरी वस्तूंसह दिसतात. यात हार्दिक पांड्याचे नाव आघाडीवर आहे.




**कर्जत : तालुक्यातील चांधई येथील दिनेश शिनारे यांच्या निवासस्थानी विराजमान २१ दिवसांच्या बाप्पाचे शिवसेनेच्या युवासेनेचे कर्जत तालुका चिटणीस नितीन बडेकर यांनी दर्शन घेतले.**



सौजन्य : भारतीय जनता पार्टी, उलवे नोड

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com